पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 20 । 16 ऑक्टोबर, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.



# हरयाणा जिंकले महाराष्ट्रही जिंकू



## अध्यक्षीय मनोगत

# हरयाणाप्रमाणे राज्यातही भाजपाचा विजय निश्चित

हरयाणा विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला पूर्ण बहुमत मिळाले. त्या राज्यात भाजपाने यशाची हॅटट्रिक केली. २०१४ साली मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात भाजपाला लोकसभा निवडणुकीत पूर्ण बहुमत मिळाले व त्यापासून देशभर भाजपाची विजयाची मालिका सुरू झाली. त्याच पद्धतीने हरयाणात विधानसभा निवडणुकीत यश मिळाले. तेथे पुन्हा एकदा मतदारांनी भाजपाला स्पष्ट जनादेश दिला. हरयाणात भाजपाची मते आणि जागा दोन्ही वाढले आहेत. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी नोव्हेंबर महिन्यात मतदान होत असून या निवडणुकीत हरयाणाप्रमाणेच भाजपा महायुती विजयाचा झेंडा फडकावेल, याची खात्री आहे. महाराष्ट्रात २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या कालावधीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपा महायुती सरकारने प्रभावी कामगिरी केली. काँग्रेसच्या सत्तेच्या काळात अनेक वर्षे प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लागले आणि जलयुक्त शिवारसारख्या अनेक चांगल्या नव्या योजना यशस्वीपणे राबविल्या गेल्या. जनतेने २०१९ साली विधानसभा निवडणुकीत भाजपा महायुतीला स्पष्ट बहुमतासह जनादेश दिला. त्यानंतर विश्वासघातामुळे भाजपाला निवडणूक जिंकूनही विरोधात बसावे लागले. त्या काळात अडीच वर्षे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपाने जनतेच्या हितासाठी जोरदार संघर्ष केला. ३० जून २०२२ रोजी भाजपा महायुतीचे सरकार राज्यात पुन्हा सत्तेवर आल्यानंतर गेल्या सव्वादोन–अडीच वर्षांच्या कालावधीत सरकारने कमी कालावधीत पुन्हा प्रभावी कामगिरी केली आहे. आपल्या सरकारने लागू केलेल्या लाडकी बहीण योजनेला जबरदस्त लोकप्रियता लाभली आहे. ठिकठिकाणी झालेल्या मेळाव्यात हजारोंच्या संख्येने लाडक्या बहिणी उपस्थित राहिल्या. या योजनेने कोट्यवधी महिलांना सबल केले आहे आणि त्यांना आत्मविश्वास दिला आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज, एक रुपयात पीक विमा, तरूणांसाठी इंटर्नशिप योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण शिक्षण योजना अशा अनेक कल्याणकारी योजना आपल्या सरकारने यशस्वीपणे लागू केल्या आहेत. नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाच्या बहुतांश भागाचा वापर सुरू झाला आहे. अटल सेतू पूर्ण झाला आहे. मुंबईच्या कोस्टल रोडचा बराच भाग पूर्ण झाला आहे. आपल्या सरकारने मेट्रोसह अनेक पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पावले टाकली आहेत. आपल्या सरकारच्या काळात महाराष्ट्र पुन्हा एकदा गुंतवणुकीच्या बाबतीत आघाडीवर आला आहे. 'सब का साथ, सब का विकास, सब का विश्वास, सब का प्रयास', हा मंत्र घेऊन आपल्या सरकारने समाजाच्या सर्व घटकांसाठी कल्याणकारी योजना राबवितानाच महाराष्ट्र राज्य आर्थिक विकासाच्या बाबतीत अग्रेसर राहील यासाठी काम केले आहे. ही सर्व कामे घेऊन आपण जनतेसमोर जाणार आहोत आणि कामगिरीच्या जोरावर जनादेश मागणार आहोत. मला खात्री आहे की, जनता आपल्याला पूर्ण आशिर्वाद देईल. पक्ष संघटना म्हणून संपूर्ण समर्पणाने कामाला लागू आणि विधानसभा निवडणुकीत पूर्ण विजय मिळवू. सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग








०४ खोटा प्रचार करणा-या काँग्रेसला मतदारांनी नाकारले

०७ नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावरील विश्वास पुन्हा सिद्ध

१० हरयाणाने अनेकांची 'विमाने' खाली आणली




१३ आरक्षणप्रश्नी केवळ फडणवीसच लक्ष्य का?

१८ कौशल्य प्रशिक्षणातून रोजगार विकास

२४ 'मेक इन इंडिया'ची 10 वर्षे






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# खोटा प्रचार करणा-या काँग्रेसला मतदारांनी नाकारले



● पंतप्रधान नरेंद्र मोदी

हरयाणात सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवल्यानंतर आणि जम्मू-काश्मीरमध्ये ऐतिहासिक यश मिळवल्यानंतर केंद्रीय मुख्यालयात झालेल्या विजयोत्सावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संक्षिप्त अंश.

**हरयाणात** सलग तिसऱ्यांदा कमळ फुलले आहे. महाभारताचे युद्ध ज्या भूमीवर लढले गेले, त्या कुरूक्षेत्राच्या भूमीवर म्हणजे हरयाणात सत्तेचा विजय झाला आहे. 'गीतेच्या भूमीवर' सुशासनाचा विजय झाला आहे. समाजातील प्रत्येक जातीने, प्रत्येक वर्गांने भारतीय जनता पार्टीला मतदान केले आहे. याबद्दल मी हरयाणाच्या जनतेला मन:पूर्वक नमन करतो. हरयाणाच्या मतदारांनी भाजपाला तिसऱ्यांदा सत्ता देताना मागील वेळेपेक्षा अधिक मते दिली आहेत. या विजयाचा प्रतिध्वनी खूप दूरपर्यंत ऐकू येणार आहे. काश्मीरचे ३७० वे कलम रद्द केल्यानंतर काश्मीरमध्ये हिंसाचाराचा आगडोंब उसळेल, अशी भीती काही लोकांनी व्यक्त केली होती. प्रत्यक्षात मात्र काश्मीरमध्ये हिंसाचाराची एकही घटना घडली नाही. गेल्या पाच वर्षांत निर्माण झालेल्या शांततेमुळे काश्मीरचे स्वर्गीय सौंदर्य उजळून निघाले आहे. जम्मू–काश्मीरमध्ये जनतेने भरघोस मतदान केले. काश्मीरमध्ये शांततेत पार पडलेल्या निवडणुका हा भारतीय संविधानाचा विजय आहे. भारतीय लोकशाहीचा काश्मीरमध्ये विजय झाला आहे. अनेक वर्षांनंतर जम्मू–काश्मीरमध्ये शांततेत निवडणुका



पार पडल्या. नॅशनल कॉन्फरन्सला मतदारांनी सत्ता दिली असली तरी भारतीय जनता पार्टीला सर्वाधिक मते मिळाली आहेत. काश्मीरच्या जनतेचे मी आभार मानतो. या निवडणुकीत अविश्रांत परिश्रम घेणाऱ्या जम्मू–काश्मारमधील भाजपा कार्यकर्त्यांना मी नमन करतो.

हरयाणातील विजयाचे श्रेय त्या राज्यातील भाजपा कार्यकर्त्यांना आहे. हरयाणात प्रदेश शाखा आणि राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी अथक परिश्रम घेतल्यामुळे हरयाणात पक्षाने सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवली. हरयाणाच्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्षमतेचा आणि विनम्र कार्यशैलीचा हा विजय आहे. १९६६ मध्ये निर्मिती झालेल्या हरयाणामध्ये आजवर १३ वेळा विधानसभेच्या निवडणुका झाल्या यापैकी १० निवडणुकांमध्ये हरयाणाच्या मतदारांनी सत्ता बदल केला आहे. सलग १० वर्षे सत्तेत असलेल्या पक्षाला पुन्हा सत्तेची संधी देण्याचा प्रकार हरयाणात प्रथमतच घडला आहे. भाजपाची सत्ता ज्या–ज्या राज्यात येते तेथे मतदार अनेक वर्षे भाजपाला पुन्हा–पुन्हा संधी देतात, असे दिसून आले आहे. सामान्य मतदारांना काँग्रेसचे खरे रूप कळून चुकले आहे. सत्ता नसते तेव्हा काँग्रेसची अवस्था 'जल बिन मछली' अशी होते. सत्तेसाठी कासावीस झालेले काँग्रेस नेते जाती–जातींमध्ये, समाजा–समाजांमध्ये विद्वेषाचे विष पसरवण्याचे काम करू लागतात. भारताचे विभाजन करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय शक्ती गेल्या १० वर्षांपासून सक्रीय आहेत. या शक्तींना काँग्रेस सहाय्य करत आहे. हरयाणाच्या मतदारांनी या देशविरोधी शक्तींना जोरदार थप्पड लगावली आहे.

मतदारांनी सत्तेपासून दूर ठेवल्याने अस्वस्थ झालेल्या काँग्रेसने प्रत्येक सरकारी संस्थेविषयी आणि यंत्रणेविषयी देशात आणि विदेशातही संशय निर्माण करण्याचे काम सुरू केले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या निपक्ष:पातीपणाविषयी शंका निर्माण करण्याचे काम केले होते. निकालानंतर काँग्रेस नेत्यांची तोंडे बंद झाली. वेगवेगळ्या जातींमध्ये विद्वेष निर्माण करण्याचे काम काँग्रेसकडून कसे होत आहे, याचा अनुभव संपूर्ण देशाने घेतला आहे. तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्मलेल्या काँग्रेसच्या नेतेमंडळींना गोरगरीब, वंचित, कष्टकरी, दलित, आदिवासी वर्गातील लोकांचे दु:ख कळणार नाही. अनेक वर्ष सत्ता भोगलेल्या काँग्रेसने दलित आणि मागासवर्गीय समाजावर सर्वाधिक अन्याय केला आहे. गोरगरिबांच्या, कष्टकऱ्यांच्या घर, पाणी, वीज यासारख्या किमान गरजाही काँग्रेसने अनेक वर्षे सत्ता भोगूनही पूर्ण केल्या नाहीत.

जम्मू–काश्मीरमध्ये झालेली निवडणूक अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरली. जम्मू–काश्मीरमध्ये ३७० आणि

(सर्व छायाचित्रे: अजय सिंह, दिल्ली)





३५(अ) या कलमांमुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान पूर्णपणे लागू होऊ शकले नव्हते. आमच्या सरकारने ही कलमे हटवली. त्यानंतर या राज्यात पहिली निवडणूक झाली. काश्मीरच्या सामान्य माणसाला खऱ्या लोकशाहीचा अनुभव येऊ लागल्यामुळे तेथे मोठ्या उत्साहात मतदान झाले. भारतीय जनता पार्टीसाठी देश सर्वोच्च आहे. गोरगरिबांसाठी काम करण्याच्या आमच्या इच्छेला जनतेने प्रतिसाद दिला आहे. याबद्दल मी जनतेचे आभार मानतो.


**(या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा उपस्थित होते.)**

**जय हिंद, जय भारत**

# नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावरील विश्वास पुन्हा सिद्ध

● जे.पी.नड्डा, राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय आरोग्य मंत्री

हरयाणात सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवल्यानंतर आणि जम्मू-काश्मीरमध्ये ऐतिहासिक यश मिळवल्यानंतर केंद्रीय मुख्यालयात झालेल्या विजयोत्सावेळी राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संक्षिप्त अंश.




**हरयाणात** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपण ऐतिहासिक विजय मिळवला आहे. हरयाणाच्या जनतेने राज्याची सत्ता सलग तीन वेळेस प्रथमच एका पक्षाकडे सोपविली आहे. हरयाणाच्या विजयाबरोबरच जम्मू-काश्मीरमध्ये सर्वाधिक मते मिळवण्याची केलेली कामगिरी तितकीच महत्वाची आहे. २०१४ मध्ये देशाची सत्ता हाती आल्यानंतर गेल्या १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अथक परिश्रम घेऊन देशाचे चित्र बदलवण्याची कामगिरी केली आहे. हरयाणातील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास आणि कल्याणकारी राज्य कारभारावर पसंतीची मोहोर उमटवली आहे. सत्ता ही केवळ भोगण्यासाठी नसते तर देशसेवेसाठी आणि सामान्य माणसाच्या विकासासाठी असते, हा मंत्र घेऊन नरेंद्र मोदी यांनी आपल्या सरकारचा कारभार लोकाभिमुख पद्धतीने केला. समर्पण भावनेने नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे सांभाळली आहेत. या निकालामुळे, 'मोदी है तो मुमकीन है', ही घोषणा पुन्हा खरी ठरली आहे. मोदीजींनी देशाच्या राजकारणाचे स्वरूप पूर्णतः बदलून टाकले. काँग्रेसने अनेक वर्षे घराणेशाहीच्या राजकारणाला प्राधान्य देत विविध जाती-धर्मीयात फूट पाडण्याचे काम केले. सत्ता गेल्यानंतरही काँग्रेसचे नेते आजही राजकीय स्वार्थासाठी विविध समाजांमध्ये, जातीमध्ये, धर्मामध्ये फूट पाडण्याचे सातत्याने प्रयत्न करीत आहेत. घराणेशाहीच्या राजकारणाला काँग्रेसने खतपाणी घातल्यामुळे गल्लीपासून दिल्लीपर्यंत कुटुंबशाहीची चलती झाली. पक्षासाठी तळमळीने काम करणाऱ्या सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांचे घराणेशाहीच्या राजकारणामुळे मोठे नुकसान झाले. ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत सर्वत्र विशिष्ट कुटुंबातील सदस्यांना संधी मिळत गेली. घराणेशाहीमुळे काँग्रेस पक्षात अंतर्गत लोकशाहीचा अंत झाला. राजकारणात काँग्रेसमुळे करप्शन, कमिशन आणि क्रिमीनलायझेशन अशा नव्या संकल्पा रूढ झाल्या. त्याचा



परिणाम अनेक वर्षांपासून सामान्य भारतीय नागरिकाला भोगावा लागत आहे.

पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षात भ्रष्टाचार संपवून टाकला. कुटुंबशाही, विविध जाती-धर्मात फूट पाडण्याच्या काँग्रेसच्या धोरणाला मोदीजींनी मूठमाती दिली. सरकारने सामान्य माणसाला उत्तरदायी असले पाहिजे, या तत्वानुसार मोदीजींनी गेल्या १० वर्षात कारभार केला आहे. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच काँग्रेस नेतृत्वाने विधानसभा निवडणुकीतही हरयाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये खोट्या-नाट्या बातम्या पसरवण्याचे काम केले. मात्र सामान्य मतदारांनी आता आपली फसवणूक होऊ द्यायची नाही, असा निर्धार करत काँग्रेसला सत्तेबाहेरच ठेवले. उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश या राज्यात भारतीय जनता पार्टीने मोदीजींच्या नेतृत्वाखाली सलग दोनदा सरकार स्थापन केले. गोव्यामध्ये आपण सलग तीन वेळा सरकार स्थापन केले. हरयाणात आपण तोच विक्रम केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पार्टीच्या संघटनेत अनेक वर्षे काम केले आहे. हरयाणाचे प्रभारी म्हणून काम करताना मोदीजींनी हरयाणा अक्षरश: पिंजून काढला होता. त्यामुळे या राज्यातील शहरी-खेडी याबद्दल त्यांना संपूर्ण माहिती आहे. पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांना मोदीजी नावनिशी ओळखतात. या राज्यातले प्रश्न, समस्या, चालीरिती, परंपरा याची त्यांना जाण आहे. संघटनेचे काम करत असताना मोदीजींनी हरयाणात पक्ष संघटनेला बळकट करण्याचा पाया घातला. अनेकजणांनी हरयाणात भारतीय जनता पार्टी पराभूत होणार, असे भविष्य वर्तविले होते. या सर्वांचे भविष्य खोटे ठरवत हरयाणाच्या मतदारांनी मोदीजींच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केला. मागील निवडणुकीपेक्षा आपल्या जागांमध्ये आणि मतांमध्येही वाढ झाली आहे. यावरून हरयाणाच्या जनतेचा आपल्या पक्षाच्या नेतृत्वावर असलेला दृढ विश्वास पुन्हा प्रकट झाला आहे. हरयाणात आपल्या सत्ता मिळणार अशी स्वप्ने अनेक मंडळींनी रंगवली होती. या मंडळींना हरयाणाच्या मतदारांनी जागेवर आणले आहे. खोट्या प्रचाराचा अवलंब करून सत्ता मिळवू पाहणाऱ्या या नेतेमंडळींना मतदारांनी घरी बसवले आहे. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलणार, आरक्षण संपवणार, असा खोटा प्रचार करून मागासवर्गीय मतदारांची दिशाभूल केली गेली. या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी अशा खोट्या प्रचारावर विश्वास ठेवला नाही. लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसने मतदारांमध्ये संभ्रम पसरवण्याचा प्रयत्न केला. मात्र हा प्रचार नाकारून मतदारांनी काँग्रेसला धडा शिकवला. अनुसूचित जातीसाठीच्या राखीव जागांवर भारतीय जनता पार्टीने मोठा विजय मिळवला आहे. युवक, शेतकरी, दलित आणि महिला अशा समाजातील सर्व घटकांनी भारतीय जनता पार्टीवर विश्वास प्रकट केला आहे. भारतीय जनता पार्टीने समर्पणाच्या भावनेने विकसित भारत संकल्प साध्य करण्याचा ध्यास घेतला आहे. या संकल्पावर सामान्य माणसाचा असलेला विश्वास निवडणुकीच्या निकालातून प्रकट झाला आहे. इमानदारीच्या राजकारणाचा शब्द देणारा एक बेईमान पक्ष हरयाणाच्या निवडणुकीत उतरला होता. मात्र सर्वच्या सर्व म्हणजे ९० जागांवर या पक्षाच्या उमेदवारांची अनामत रक्कमही जप्त झाली. जम्मू-काश्मीरमध्ये मागील निवडणुकीपेक्षा आपल्या जागा वाढल्या. त्याचबरोबर आपण सर्वाधिक मते मिळवली, हे उल्लेखनीय आहे. हरयाणा आणि जम्मू-काश्मीरच्या जनतेला मी मन:पूर्वक धन्यवाद देतो. या दोन्ही राज्यातील पक्ष कार्यकर्त्यांचे मी अभिनंदन करतो. आता आपल्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र, झारखंड आणि दिल्ली या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्येही विजय मिळवण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. या तिन्ही राज्यांच्या निवडणुकीतही कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीने उतरले पाहिजे. ■

# जल्लोष विजयाचा













**प्रदेश कार्यालयात जल्लोष विजयाचा- उपस्थिती-** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पर्यटन व ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, विक्रांत पाटील, शायना एनसी, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, मुंबई प्रदेश सरचिटणीस संजय उपाध्याय, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, उत्तर भारतीय युवा मोर्चा अध्यक्ष संजय पांडे आदी.

# हरयाणाने अनेकांची 'विमाने' खाली आणली




लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे संख्याबळ २०१९ च्या तुलेनत घटले. त्यामुळे अनेक विश्लेषक, पत्रकारांना आनंदाचे भरते आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिश्मा संपला, केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्ष फार काळ भाजपाच्या साथीत राहणार नाहीत, केंद्रातले मोदी सरकार फार काळ टिकणार नाही, अशी भविष्यवाणी वर्तविणाऱ्या मंडळींची संख्या प्रचंड वाढली होती.

**हरयाणा,** महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांनंतर मोदी सरकार कोसळणार आणि राहुल गांधी पंतप्रधान होणार, अशी स्वप्ने अनेकांना दिवसाढवळ्या पडू लागली होती. यापैकी हरयाणा विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निकालानंतर अनेकांची हवेत गेलेली विमाने जमिनीवर आदळली आहेत. हरयाणात भारतीय जनता पार्टीचा सुपडा साफ होणार आणि काँग्रेसला दणदणीत बहुमत मिळणार, असे छातीठोकपणे सांगणाऱ्यांचा हरयाणाच्या मतदारांनी मुखभंग केला आहे. वेगवेगळ्या शेतकरी संघटनांनी पंजाब, हरयाणात सुरू केलेले आंदोलन, हरयाणातील महिला कुस्तीगिरांनी मोदी सरकार विरोधात केलेले आंदोलन यामुळे भारतीय जनता पार्टी विरोधात लाट तयार झाली असून त्याचा फायदा घेत काँग्रेस मोठ्या बहुमताने सत्ता मिळवणार, असा विश्वास या विश्लेषकांना, पत्रकारांना, विचारवंतांना वाटत होता. हे विश्लेषक, पत्रकार



**किसान, जवान, पेहलवान अशी काँग्रेसची प्रचाराची त्रिसूत्री होती. पंजाब, हरयाणा, उत्तर प्रदेशमधील शेतकरी संघटनांचे आंदोलन राजधानी दिल्लीच्या सीमेवर अनेक दिवस चालू होते. आता या संघटनांचे कार्यकर्ते पंजाब-हरयाणाच्या सीमेवर आंदोलन करीत आहेत. या आंदोलनाच्या माध्यमातून मोदी सरकार कसे शेतकरी विरोधी आहे, पत्रकार, विश्लेषक मंडळींनी केला होता. या आंदोलनाचा फटका हरयाणात भाजपाला बसणार, असे भविष्य अनेकजण वर्तवत होते. मात्र हरयाणाच्या शेतकऱ्यांनी भाजपाविरोधी प्रचाराला प्रतिसाद दिला नाही. महिला कुस्तीगिरांच्या आंदोलनाचे निमित्त करूनही मोदी सरकार आणि भाजपाला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न झाले. कुस्तीगिरांच्या आंदोलनामुळे हरयाणात भाजपा विरोधात मोठा असंतोष असल्याचे सांगितले जात होते. या प्रचारालाही मतदारांनी दाद दिली नाही.**

हरयाणातील लोकसभा निवडणुकीचे दाखले देत होते. २०१४, २०१९ मध्ये हरयाणातील लोकसभेच्या सर्वच्या सर्व म्हणजे १० जागा जिंकणाऱ्या भारतीय जनता पार्टीला यावेळी फक्त ५ जागा जिंकता आल्या होत्या. लोकसभा निकालानंतर हरयणाची महिला कुस्तीगीर विनेश फोगाट हिला वजन वाढल्याच्या तांत्रिक कारणामुळे ऑलिंपिक पदकापासून दूर राहावे लागले. केंद्र सरकारमुळेच विनेशचे पदक हुकले, असा अपप्रचार काही मंडळींनी केला होता. खुद्द विनेशनेही मोदी सरकारमुळेच आपले पदक हुकले, असा आरोप केला होता. पदक हुकलेल्या विनेशबद्दल भारतीयांच्या मनात सहानुभूती निर्माण होणे स्वाभाविकच होते. हरयाणात ही सहानुभूती अधिक प्रमाणात असणेही स्वाभाविक होते. या पार्श्वभूमीवर विनेश फोगाटने काँग्रेसमध्ये प्रवेश करत काँग्रेसची उमेदवारीही मिळवली. विनेश फोगाट ज्या जाट समाजाचे प्रतिनिधीत्व करते त्याच समाजाच्या नेत्यांनी शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातून मोदी सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला होता. साक्षी मलिक, बजरंग पुनिया यासारख्या कुस्तीगिरांनी विनेशच्या आंदालेनाला सक्रीय पाठिंबा दिला होता. या पार्श्वभूमीवर हरयाणातील लोकसंख्येत २५ टक्के प्रमाण असलेला जाट समाज भाजपाविरोधात एकवटून मतदान करेल आणि भाजपाची सत्ता एकहाती उलटवून टाकेल, असे अंदाज या विश्लेषकांनी वर्तविले होते. या अंदाजांना मतदानोत्तर चाचण्यांनी (एक्झिट पोल) आणखीनच हवा भरली. मतमोजणीच्या प्रारंभी टपालाने आलेल्या मतांची मोजणी झाली. त्यात काँग्रेसने सुमारे ६५ मतदारसंघात आघाडी मिळवण्याचे वृत्त वृत्तवाहिन्यांवर झळकताच या विश्लेषक आणि विचारवंतांना हर्षवायू होण्याची वेळ आली. टपालाने आलेली मते संपल्यावर प्रत्यक्ष मतदान झालेल्या मतांची मोजणी सुरू झाली, त्यात भारतीय जनता पार्टी आघाडीवर असल्याचे आणि ही आघाडी कमी होणार नसल्याचे चित्र दिसू लागल्यावर या विश्लेषकांची, काँग्रेस समर्थकांची हवेत गेलेली विमाने हळूहळू जमिनीवर येऊ लागली. या विमानांचे क्रॅश लॅंडिंग झाल्यावर नेहमीप्रमाणे सरकारी यंत्रणा आणि ईव्हीएमच्या नावाने बोटे मोडणे सुरू झाले. ज्या जाट समाजाच्या हवाल्यावर काँग्रेसच्या विजयाचे गणित मांडले जात होते, त्या जाट समाजाच्या प्रभाव क्षेत्रातही भारतीय जनता पार्टीने जवळपास काँग्रेसच्या बरोबरीने जागा मिळवल्या.

लोकसभा निवडणुकीत संविधान बदलून आरक्षण संपवणार, असा खोटा प्रचार करणाऱ्या काँग्रेस आणि काँग्रेस समर्थकांना तुमच्या खोट्या प्रचाराची वॉरंटी संपली आहे, असेच हरयाणाच्या मतदारांनी मतपेटीद्वारे सांगितले आहे. हरयाणाच्या जनतेने काँग्रेसच्या खोटेपणाला सणसणीत चपराक देताना भारतीय जनता पार्टीच्या सरकारने गेल्या १० वर्षात दिलेल्या सुशासनाला आपली पसंती असल्याचे निर्विवादपणे दाखवून दिले आहे.

**हरयाणात सैन्य दलातील जवानांची संख्या मोठी आहे. मोदी सरकारने सुरू केलेल्या अग्निवीर योजनेवरून काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी हरयाणातील प्रचारमोहिमेत मोदी सरकार आणि भाजपा विरोधात खोटी माहिती पसरवण्याचे प्रयत्न केले. अग्निवीर म्हणून दाखल झालेल्या तरुणांना त्यांच्या सेवेबद्दल कसालाच मोबदला मिळणार नाही, अशी धादांत खोटी माहिती राहुलबाबा हरयाणात प्रचारसभेत सांगत होते. प्रत्यक्षात अग्निवीरांचा सेवा काल समाप्त झाल्यानंतर त्यांना ५६ लाख रुपये दिले जात आहेत. सेवा संपल्यानंतर त्यांना राज्य सरकारी सेवेत सामावून घेतले जात आहे. हुतात्मा झालेल्या अग्निवीरांच्या कुटुंबियांना १ कोटी ५० लाख इतकी रक्कम भरपाई म्हणून दिली जाते. त्याचबरोबर अग्निवीरांचा ५० लाख ते १ कोटी रुपयापर्यंतचा आयुर्विमा काढण्यासाठी सरकारने योजना तयार केली आहे. या विम्याच्या हप्त्यापोटी अग्निवीरांना एक पैसाही भरावा लागत नाही. असे असतानाही राहुल गांधींनी हरयाणातील तरुणांनी अग्निवीर योजनेत सहभागी होऊ नये, या हेतूने खोटी माहिती पसरवली. त्यांच्या या प्रचारावर हरयाणातील तरुणांनी विश्वास ठेवला नाही. तरुणांना अग्निवीर योजनेची पूर्ण माहिती आहे, हे या निवडणुकीत दिसले.**

मनहरलाल खट्टर यांची ९ वर्षे आणि त्यानंतर नायब सिंह सैनी यांचा १ वर्षाचा कारभार अनेक लोककल्याणकारी योजनांनी व्यापला आहे. गेल्या १० वर्षात भाजपा सरकाराविरोधात भ्रष्टाचार, गैरकारभाराचा एकही आरोप विरोधक, पत्रकार करू शकले नाहीत. भूपेंद्रसिंह हुडा यांच्या १० वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात सामान्य माणसाला आलेला भ्रष्टाचाराचा अनुभव आणि गेल्या १० वर्षातील भाजपाचे स्वच्छ सरकार याची तुलना करत मतदारांनी भाजपाला सलग तिसऱ्यांदा सत्तेत बसवले आहे. भाजपा सरकारने शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या होणाऱ्या नुकसानीसाठीची भरपाई १५ हजार रुपये प्रति एकर एवढी वाढवली. २०१३ पर्यंत एकरी ६ हजार रुपये एवढीच भरपाई मिळत होती. गेल्या ९ वर्षात हरयाणातील शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून ११ हजार कोटी एवढी भरपाई बँक खात्यात मिळाली आहे. पंजाब, उत्तर प्रदेश आणि हरयाणातील काही शेतकरी संघटनांनी शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीसाठी आंदोलन सुरू केले आहे. याच मागणीसाठी या संघटनांचे कार्यकर्ते दिल्लीच्या सीमेवर राष्ट्रीय महामार्ग अडवून बसले होते. आता ही आंदोलक मंडळी हरयाणा-पंजाबच्या शंभू सीमेवर अनेक महिन्यांपासून आंदोलन करत आहेत. हरयाणातील भाजपा सरकारने २४ पिकांची आधारभूत किमतीने (एमएसपी) खरेदी करण्याचा निर्णय घेतला. आंदोलन करणाऱ्या शेतकरी संघटनांच्या एकाही नेत्याने याबद्दल भाजपा सरकारचे अभिनंदन करण्याचे सौजन्यही दाखवले नाही. हरयाणा सरकार २४ पिकांची आधारभूत किमतीने खरेदी करू शकते तर पंजाब सरकार का करू शकत नाही?, असे विचारण्याची हिंमत आंदोलक शेतकरी संघटनांच्या एकाही नेत्याने दाखवलेली नाही. भाजपा सरकारवर शेतकरी नाराज असल्याचा दावा करणाऱ्या राजकीय विश्लेषकांना नायब सिंह सैनी सरकारने आधारभूत किमतीने २४ पिकांची खरेदी करण्याच्या निर्णयाचे महत्व लक्षात आले नसावे. हुडा सरकारच्या कार्यकाळात लाच दिल्याशिवाय सरकारी पातळीवरची नोकरी मिळत नव्हती. गेल्या १० वर्षात हरयाणा सरकारची १.१० लाख कर्मचाऱ्यांची नोकरभरती एक दमडीही न घेता 'मिशन मेरिट' या अभियानाद्वारे पारदर्शक पद्धतीने झाली. वंचित, शोषित समाजाच्या हजारो युवकांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या आहेत. सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना ५.५० लाख टॅब्लेटचे वितरण भाजपा सरकारने केले आहे. त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे ई-लर्निंगचे स्वप्न प्रत्यक्षात आले आहे. ओबीसी समाजासाठीच्या क्रिमिलेअरची मर्यादा ८ लाखांपर्यंत वाढवणे, महानगरपालिका आणि पंचायतींमध्ये ओबीसी आरक्षण मर्यादा वाढवणे यासारखे निर्णयही भाजपा सरकारने घेतले. अशा लोककल्याणकारी योजनांचा लाभ झालेल्या मतदारांनी भाजपाला सलग तिसऱ्यांदा सत्ता देत काँग्रेसच्या खोट्या प्रचाराला लाथाडले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या जागा ५२ वरून ९९ वर पोहचल्या. काँग्रेसची कामगिरी राहुल गांधींच्या नेतृत्वामुळेच सुधारली, असा भ्रम करून घेत अनेक भाजपाविरोधी पत्रकारांनी राहुलबाबांच्या आरत्या ओवाळणे सुरू केले होते. हरयाणाच्या मतदारांनी राहुलबाबाची असत्याची जिलेबी फॅक्टरी एका फटक्यात कवडीमोल करून टाकली आहे. ■

# आरक्षणप्रश्नी केवळ फडणवीसच लक्ष्य का?



● देवेंद्र गावंडे

> मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी अथक प्रयत्न करून मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण दिले. सर्वोच्च न्यायालयात पहिल्या सुनावणीवेळी हे आरक्षण टिकले होते. असे असतानाही श्री. फडणवीस यांना टीकेचे लक्ष्य का केले जात आहे?

**ओबीसींमधूनच** आरक्षण हवे व 'सगेसोयरे' संदर्भातील आदेश देण्यात यावा या मागणीसाठी सुरू असलेले मनोज जरांगे यांचे आमरण उपोषण स्थगित झाले. निवडणुकीआधीचे हे शेवटचे आंदोलन. ते करण्याचा व त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा अधिकार मराठा समाजाला निश्चितच आहे. त्यावर कुणाची हरकत असण्याचे काही कारण नाही. मात्र, हे उपोषण स्थगित करताना जरांगेंनी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले व त्यांच्यावर बोचऱ्या भाषेत टीका केली. त्यांचे आंदोलन हाताळण्याची व त्यातून तोडगा काढण्याची जबाबदारी सरकारातील एक उपमुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांची आहे हे मान्य, पण त्यांची एकट्याचीच ही जबाबदारी आहे का?

सरकारचे प्रमुख आहेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्या जोडीला आणखी एक उपमुख्यमंत्री आहेत अजित पवार. हे दोघेही मराठा समाजातून समोर आलेले नेते. मग जरांगे त्यांच्यावर टीका का करत नाहीत? हे दोघेही त्याच समाजाचे प्रतिनिधित्व करणारे म्हणून त्यांची जबाबदारी अधिकच! हे ठाऊक असूनही या आंदोलनातून केवळ फडणवीसांना लक्ष्य का केले जात आहे? ते उच्चवर्णीय, पण अल्पसंख्य समाजातून येतात म्हणून की त्यांच्याकडे असलेल्या खात्यातील पोलिसांनी या आंदोलनावर लाठीमार केला म्हणून? केवळ लाठीमार हे एकमेव कारण या रागामागे असेल तर याबद्दल फडणवीसांनी केव्हाच माफी मागितलेली आहे. शिवाय मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या



कार्यकाळात मराठ्यांना स्वतंत्र प्रवर्गाद्वारे आरक्षण देणारे फडणवीस राज्यातील एकमेव नेते होते. तरीही जरांगेंचा त्यांच्यावरचा राग कमी न होण्याची नेमकी कारणे कोणती? यामागे काही राजकारण आहे का, याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केल्यास अनेक गोष्टींचा उलगडा आपोआप होऊ लागतो. हे राज्य पुरोगामी. येथील राजकारण व त्यातून आकार घेणाऱ्या सत्ताकारणाला पुरोगामित्वाची किनार, असे कितीही म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात तशी स्थिती कधी नव्हतीच. येथील राजकारण कायम मराठा व मराठेतर या दोनच अंगांनी कायम फिरत राहिले. राज्याची निर्मिती झाल्यापासून मराठ्यांचा प्रभाव राजकारण व सत्ताकारणावर राहिला. त्याचे स्वरूप सर्वपक्षीय होते. हा प्रभाव कोणत्याही परिस्थितीत कमी होऊ नये, म्हणून या समाजातून येणाऱ्या नेत्यांनी पक्ष कोणताही असो, एकमेकांना सांभाळून घेण्याची, मोठे होण्यास हातभार लावण्याची, संस्थात्मक उभारणीत मदत करण्याची वृत्ती कायम अंगी बाळगली. राजकीय विरोध करायचा तो केवळ निवडणुकांपुरता. नंतर एकमेकांना मदत करायची, असेच या धोरणाचे स्वरूप होते.

हा समाज राज्याच्या विशिष्ट भागात एकवटलेला. त्यामुळे प्रगतीची पहिली फळे चाखण्याची संधी त्यांना मिळाली. एकमेकांना सांभाळून घेण्याच्या मुद्द्यावर मराठा नेत्यांची एकी एवढी घट्ट होती की तुलनेने गरीब असलेल्या मराठवाड्यातील मराठा समाज या फळांपासून वंचित राहिला. विदर्भ तर तेव्हा या एकीच्या राजकारणापासून कित्येक कोस दूर होता. विकासाचा प्रादेशिक असमतोल तयार झाला तो यातून. मराठा केंद्रित राजकारणाला कुणी नावे ठेऊ नये व पुरोगामित्वाचा बुरखा कायम राहावा यासाठी राज्याची धुरा इतर नेत्यांकडे देण्याचे प्रयोग झाले. मा. सा. कन्नमवार, वसंतराव नाईक, बॅरिस्टर अंतुले, सुधाकरराव नाईक, सुशीलकुमार शिंदे ही त्यातली काही प्रमुख नावे. यातील कन्नमवार यांचे पदावर असतानाच निधन झाले, पण इतरांना ज्या पद्धतीने बाजूला सारण्यात आले तो घटनाक्रम नुसता नजरेसमोर आला तरी या मराठा लॉबीचे वर्चस्व किती होते हे सहज लक्षात येते. मुख्य म्हणजे या प्रयोगातील नावांवर नजर टाकली तर त्यात राज्यात मोठ्या संख्येत असलेल्या ओबीसींमधील एकही नेता नव्हता, हे दिसते.

राज्याच्या राजकारणात यश मिळवायचे असेल तर नवा पर्याय उभा करणे आवश्यक आहे हे पहिल्यांदा लक्षात आले ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या. त्यातून माधव या सूत्राचा जन्म झाला. प्रमोद महाजन, नितीन गडकरी, गोपीनाथ मुंडे यांनी याच सूत्राचा विस्तार केला व हळूहळू भाजप राज्यात स्थिरावत गेला. देवेंद्र फडणवीस यांनी याच सूत्राचा आधार घेत राज्यात पक्षाची ताकत वाढवत नेली. आरंभी 'माधव' (माळी, धनगर, वंजारी) या नावाने प्रचलित असलेले हे सूत्र नंतर व्यापक होत 'ओबीसी' असे झाले. हाच वर्ग भाजपची मतपेढी म्हणून ओळखला जाऊ लागला. राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर या पेढीचा आणखी विस्तार व्हावा, यासाठी फडणवीसांनी मराठा



जबाबदार कोण? दुर्दैव हे की फडणवीसांची ही स्पष्ट भूमिका त्यांच्याच पक्षाच्या नेत्यांनी लोकसभेच्या वेळी तळागाळात पसरवली नाही. त्यामुळे जरांगेंच्या पाठीशी उभा राहिलेला प्रामुख्याने मराठवाड्यातील मराठा समाज पक्षापासून दूर गेलाच शिवाय सरकारमधील इतर नेत्यांचे मराठ्यांकडे झुकणे बघून बिथरलेला ओबीसीसुद्धा दूर गेला. त्याचा मोठा फटका पक्षाला विदर्भ व मराठवाड्यात बसला. मराठा लॉबीला

समाजावर लक्ष केंद्रित केले. आरक्षणाचा मुद्दा वर आला तो यातून.

ओबीसीसोबत नाहीत व मराठा समाज हातून निसटतोय हे लक्षात आल्यावर व न्यायालयीन निवाडे आरक्षणाविरुद्ध जाऊ लागल्यावर ही मराठा लॉबी सक्रिय झाली व त्यातून या आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर फडणवीसांवरील टीकेमागील बोलवते धनी कोण, याचे उत्तर आपसूकच सापडते. मराठ्यांना ओबीसींमधूनच आरक्षण हवे (भलेही ते न्यायालयात टिकणार नाही, हे ठाऊक असले तरी) या दोन समाजांत ठिणगी टाकणाऱ्या मागणीचा जन्म कुणामुळे झाला हेही सहज लक्षात येते. ही मागणी समोर आल्याबरोबर राज्यातील ओबीसींमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली व भाजपचा गड असलेल्या विदर्भात आंदोलन सुरू झाले. तेव्हा फडणवीस थेट नागपुरातील ओबीसींच्या आंदोलन मंडपात पोहोचले व या प्रवर्गाच्या आरक्षणाला अजिबात धक्का लागणार नाही असे जाहीर करून मोकळे झाले. ही कृती नेमकी कुणाच्या जिव्हारी लागली? जरांगेंच्या की या मराठा लॉबीच्या हा यातला कळीचा प्रश्न. मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण दिले जाईल व ओबीसींच्या आरक्षणात कुणालाही वाटेकरी होऊ दिले जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका फडणवीसांनी घेतली, पण ते ज्या सरकारमध्ये आहेत त्यातील किती जणांनी घेतली?

मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी असे स्पष्ट बोलणे का टाळले? छगन भुजबळांचा अपवाद वगळता सरकारमधील अनेकजण मराठा आंदोलनाकडे जास्त लक्ष देतात. त्या तुलनेत ओबीसींकडे फारसे लक्ष दिले जात नाही, असे चित्र निर्माण झाले. त्याला नेमके

नेमके हेच हवे होते. आता विधानसभेतही त्याचीच पुनरावृत्ती घडावी म्हणून या सगळ्या वादात फडणवीसच दोषी आहेत, असे चित्र निर्माण केले जात आहे. मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षण ही मागणी व्यवहार्य नाही व न्यायालयात त्याचा जराही टिकाव लागू शकत नाही हे ठाऊक असूनसुद्धा फडणवीस वगळता सरकारमधील कुणीही अशी स्पष्ट भूमिका घेत नाही. यामागे काही राजकारण आहे का? असेल तर ते नेमके कुणाच्या इशाऱ्यावर केले जात आहे? सत्ताधारी व विरोधकांमधील काहींनी एकत्र येत फडणवीसांना एकटे पाडण्यासाठी तर हा प्रयोग सुरू केला नाही ना? असे अनेक मुद्दे आता समोर येत आहेत. राज्यात जेव्हा जेव्हा मराठेतर मुख्यमंत्री झाले तेव्हा तेव्हा एखाद्या मुद्द्यावर असेच काहूर उठवून त्यांची राजकीय कोंडी केली गेली. आपल्या कारकीर्दीत गुंडांच्या मुसक्या आवळणारे सुधाकरराव नाईक असोत वा विधानसभेच्या निवडणुकीत यश मिळवून देणारे सुशीलकुमार शिंदे असोत. त्यांना याच कोंडीतून मुख्यमंत्रीपदाची खुर्ची सोडावी लागली. हे राज्य केवळ मराठा नेताच चालवू शकतो असा संदेश देण्यात तेव्हा ही लॉबी यशस्वी ठरली होती. त्याला छेद देण्याचे काम फडणवीसांनी पहिल्या कारकीर्दीत केले. ते पुन्हा पदावर येऊ शकतात या भीतीतून त्यांना सातत्याने लक्ष्य केले जात आहे का? असे अनेक प्रश्न या आरक्षणाच्या गुंत्यातून उभे ठाकले आहेत. त्यावर फडणवीस कशी मात करतात व भाजपचे दिल्लीतील नेतृत्व त्यांच्या पाठीशी कसे उभे राहते हे येत्या निवडणुकीनंतर स्पष्ट होईलच.

**(दै.लोकसत्तामध्ये प्रकाशित झालेला लेख. सदर लेखातील मते लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# झूठ बोले, मविआ काटे...



संजय राऊत यांना दोषी ठरवणारे न्यायालयाचे निकाल पत्र प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना दाखविताना ज्येष्ठ नेते डॉ. किरीट सोमय्या.

> उबाठा सेनेचा भोंगा आणि महाविकास आघाडीचा स्वयंघोषित प्रवक्ता अशी 'कीर्ती'प्राप्त केलेल्या खा. संजय राऊत यांना न्यायालयाने सनसनीत चपराक लगावली आहे. भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते डॉ.किरीट सोमय्या यांच्या पत्नीशी संबंधित एका संस्थेवर केलेल्या आरोपांबाबत संजय राऊत यांना मुंबईतील माझगाव न्यायालयाने दोषी ठरवून १५ दिवसाच्या कैदेची शिक्षा सुनावली तसेच २५ हजारांचा दंडही ठोठावला आहे.

**मेधा** सोमय्या युवक प्रतिष्ठाने बनावट कागदपत्रे सादर करून मिरा-भायंदर येथे सार्वजनिक शौचालय बांधण्याचे कंत्राट मिळवले, असा आरोप संजय राऊत यांनी केला होता. संजय राऊत यांनी हा आरोप केला तेव्हा महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेत होते. डॉ.किरीट सोमय्या यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अलिबागजवळ १९ बंगल्यांच्या माहितीचा उल्लेख दडविल्याचा आरोप केला होता. उद्धव ठाकरे यांनी विधान परिषद उमेदवारी अर्जात आपल्या पत्नीच्या नावे असलेल्या या बंगल्यांची माहिती दिली नव्हती, असे डॉ. सोमय्या यांनी कागदपत्रांसह दाखवून दिले होते. उद्धव ठाकरे यांच्यावर तसेच उबाठा नेते अनिल परब यांच्यावर ठोस पुराव्यांसह शासकीय कागदपत्रे सादर करत आरोप केले होते. या आरोपांना समाधानकारक उत्तर देता येत नसल्याने उद्धव ठाकरे आणि त्यांचे चेलेचपाटे हैराण झाले होते. डॉ.सोमय्या यांच्या आरोपांपासून बचाव करण्यासाठी संजय राऊत यांनी मेधा सोमय्या यांच्यावर आरोप केले होते. राऊत यांच्या आरोपांची दखल घेत त्यावेळच्या महाविकास आघाडीने या आरोपांची चौकशी करण्याचे आदेशही दिले होते. मेधा सोमय्या यांनी संजय राऊत यांना न्यायालयात खेचल्यावर त्यांना आपल्या आरोपांच्या पुष्टर्थ पुरावे सादर करता आले नाहीत. त्यामुळेच न्यायालयाने राऊत यांना दोषी

ठरवले आहे.

केवळ संजय राऊतच नव्हे तर महाविकास आघाडीचे सर्वच प्रमुख नेते महायुती सरकारविरुद्ध सातत्याने खोटे आरोप करण्यात मश्गुल आहेत. राजकीय आरोप–प्रत्यारोपात काहीच गैर नसते. मात्र ते आरोप–प्रत्यारोप करताना राज्यात, देशात अस्थिरता माजावी, विविध समाजघटकांमधील सलोखा नष्ट व्हावा, धार्मिक सामंजस्य संपुष्टात यावे अशा हेतूने आरोप केले जात असतील तर अशा राजकारण्यांची पातळी किती घसरणीला लागली आहे, याची कल्पना येते. सव्वा दोन वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांना हटवून भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेचे सरकार सत्तेत आल्यापासून उद्धव ठाकरे, काँग्रेस आणि शरद पवार यांच्या महाविकास आघाडीने खोट्या आरोपांची राळ उडवून देण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. महाराष्ट्रातून अनेक उद्योग गुजरातमध्ये नेले जात आहेत, अटल सेतूला खड्डे पडले आहेत यासारखे आरोप महाविकास आघाडीने गेल्या काही महिन्यात केले आहेत.

अलिकडेच पुण्यात सिटी पोस्ट या सरकारी संस्थेच्या आवारात खड्डा पडला होता. त्या खड्ड्यात एका ट्रकचे चाक रुतले गेले. त्या ट्रकची छायाचित्रे प्रसारित करून पुण्यात महापालिकेने बांधलेला रस्ता खचला, असा प्रचार करण्यात महाविकास आघाडीचे नेते आघाडीवर होते. बदलापूर येथे लहानग्या मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर तेथे आंदोलन पुकारून रेल्वे सेवा विस्कळीत करण्याचा प्रयत्न केला गेला. पोलीस यंत्रणेने अनेकवेळा विनंती करूनही बदलापूर रेल्वे स्थानकात रूळावर उतरलेली मंडळी मागे हटण्यास तयार नव्हती. पोलिसांवर दगडफेक करण्याचे प्रकारही यावेळी घडले. पोलिसांना गोळीबार करण्यास भाग पाडावे, अशा हेतूनेच आंदोलकांना चिथावले जात होते. पोलिसांनी परिस्थिती संयमाने हाताळली आणि कोणताच अनुचित प्रकार घडू दिला नाही. लोकसभा निवडणुकीत आरक्षण संपवणार, अल्पसंख्याक धर्मियांना देशाबाहेर काढणार यासारख्या अफवा महाविकास आघाडीने पसरवल्या. त्याचे फळ त्यांना मुस्लीम धर्मियांच्या एकगठ्ठा मताद्वारे मिळाले. लोकसभा निवडणुकीत खोट्याची जादू चालली. मात्र विधानसभा निवडणुकीत ही जादू उपयोगी पडणार नाही, असे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या लक्षात येऊ लागल्याने विविध मार्गांनी राज्यात हिंसक घटना कशा घडतील, यादृष्टीने मविआ नेते प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्रात मणिपुरसारखी स्थिती निर्माण होत आहे, असे वक्तव्य शरद पवार यांचा सारखा ज्येष्ठ नेता करतो तेव्हा त्याचे गांभीर्य वाढते. येनकेन प्रकारे सत्ता मिळवण्यासाठी आपल्या मायभूमीत अस्थिरता निर्माण करण्याचे मविआ नेत्यांचे प्रयत्न दुर्दैवी आहेत.

काही दिवसांपूर्वी राहुल गांधी यांनी अग्निवीर योजनेवर प्रश्न उपस्थित करत केंद्र सरकारच्या अग्निवीर योजनेत हुतात्मा दर्जा दिला जात नाही. याशिवाय हुतात्मा झालेल्या अग्निवीर जवानांच्या कुटुंबीयांनाही मदत दिली जात नाही असा आरोपही केला होता.

यावेळी राहुल गांधी यांनी बुलढाण्यातील हुतात्मा अग्निवीर अक्षय गवते याचा उल्लेख केला होता. राहुल यांच्या वक्तव्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी राहुल गांधी यांचा आरोप सपशेल खोटा असल्याचे लोकसभेतच सांगितले. तसेच राहुल गांधी यांच्या दाव्यानंतर हुतात्मा अग्निवीरचे वडील लक्ष्मण गवते यांनी त्यांना आतापर्यंत एकूण १ कोटी १० लाख रुपयांची मदत मिळाल्याचे सांगितले. त्यानंतरही राहुलबाबांनी आपला असत्याचा हेका चालूच ठेवला. 'सत्य की रक्षा हर धर्म का आधार है!' असे म्हणत राहुल गांधींनी अजय सिंह यांच्या कुटुंबियांना लष्कराकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळाले नसल्याचा दावा 'एक्स' या समाज माध्यमावर केला होता.

राहुल गांधींनी हा दावा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अजय सिंह याच्या वडिलांनी लष्कराकडून आपल्याला भरपाई मिळाल्याचे स्पष्ट केले. इंडि आघाडीचा भाग असलेल्या आम आदमी पक्षाच्या अरविंद केजरीवाल यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्यावर आरोप केले होते. नितीन गडकरी यांनी न्यायलयात धाव घेतल्यानंतर केजरीवाल यांना पळता भुई थोडी झाली. न्यायालयात केजरीवाल यांना बिनशर्त माफी मागावी लागली.

न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतरही संजय राऊत यांचा बेमुर्वतखोरपणा कमी झाला नाही. या निकालाबद्दल त्यांनी न्याय व्यवस्थेवरच ताशेरे झाडले. राहुल गांधी यांच्यावरही सर्वोच्च न्यायालयाची माफी मागण्याची वेळ आली होती. तरीही त्यांची आरोप करण्याची हौस कमी झालेली नाही. या निकालानंतर तरी मविआ नेत्यांना शहाणपण येईल, अशी आशा आहे. ■

# कौशल्य प्रशिक्षणातून रोजगार विकास



● मंगल प्रभात लोढा

> सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण मिळावे, उद्योग क्षेत्रांच्या गरजेनुरूप तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित व्हावी, अद्ययावत माहिती तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे, मागणीनुसार शिक्षणाच्या सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांविषयी...

**देशातील** युवक कौशल्यपूर्ण असावेत, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षांत विविध योजना राबविल्या. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या सव्वादोन वर्षांत कौशल्य विकासाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. या योजनांविषयी...

### मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून कौशल्य विकास विभाग आणि मुख्यमंत्री जन–कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबवली जाणार आहे. योजनेसाठी ५ हजार ५०० कोटींची तरतूद करण्यात आली असून योजनेसाठी उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. **प्रशिक्षण कालावधीत बारावी उत्तीर्ण उमेदवारांना दरमहा सहा हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारकांना आठ हजार रुपये, पदवीधर आणि पदव्युत्तर पदवीधारकांना १० हजार रुपये विद्यावेतन मिळणार आहे.** प्रत्येक आर्थिक वर्षात कार्य प्रशिक्षणाच्या (इंटर्नशिप) १० लाख संधी उपलब्ध होणार असून प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक व शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक असे एकूण ५० हजार योजनादूत नेमण्यात येणार आहेत.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना

महिलांचे सर्वाधिक स्टार्टअप्स असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करणे हा योजनेचा उद्देश आहे. त्यासाठी १०० कोटींच्या निधीची तरतूद असून, सुमारे ५०० स्टार्टअप्सना २५ लाखांपर्यंत आर्थिक साहाय्य देण्यात येणार आहे.

### प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना

पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांची व्यवसायवृद्धी व्हावी यासाठी १८ प्रकारचे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या विश्वकर्मांना पाच दिवसांचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येत आहे. लाभार्थ्यांना संबंधित व्यवसायाच्या टूलकिटसाठी १५ हजार रुपयांचे ई-व्हाऊचर दिले जाते. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्याला प्रति दिवस ५०० रुपयेप्रमाणे एकूण तीन हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. प्रशिक्षणानंतर पात्र लाभार्थ्यांना व्यवसायवृद्धीसाठी विनातारण रुपये एक लाख रकमेचे कर्ज ५ टक्के व्याजदराने देण्यात येईल. पहिल्या हप्त्याच्या कर्जाची नियमित परतफेड केल्यास, लाभार्थ्यांना दोन लाखांचे कर्ज ५ टक्के व्याजदराने विनातारण मिळेल. जून २०२४ पर्यंत राज्यात एकूण ३६ हजार ४३ विश्वकर्मांनी यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

### आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आलेले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीतंर्गत ही नावीन्यपूर्ण योजना सुरू करण्यात आली आहे. हजार नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. प्रत्येक केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येईल. यामुळे संपूर्ण राज्यात १५ ते ४५ वयोगटातील साधारण एक लाख ५० हजार युवक-युवतींना दरवर्षी प्रशिक्षण मिळणार आहे.

### महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना

या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त पाच हजार रुपये यापैकी कमी असलेले विद्यावेतन शासनातर्फे देण्यात येते. राज्यात एकूण ४७ हजार ६१४ उद्योग व इतर आस्थापना शिकाऊ उमेदवारीसाठी नोंदणीकृत असून सद्या:स्थितीत एकूण आठ हजार ५३६ उद्योग व इतर आस्थापना शिकाऊ उमेदवारी योजेनेची अंमलबजावणी करीत असून सद्या:स्थितीत एकूण दोन लाख ५४ हजार ८३९ शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत.

### महाराष्ट्र इंटरनॅशनल

आंतरराष्ट्रीय स्तरावर युवकांना रोजगार मिळावा यासाठी महाराष्ट्र इंटरनॅशनल हा स्वतंत्र कक्ष महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीअंतर्गत स्थापन करण्यात आला आहे. त्याद्वारे परदेशात नोकरीसाठी जाऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी समुपदेशन आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. आंतरराष्ट्रीय भाषांचेही प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

### महापुरुषांच्या कौशल्य विचारांचा अभ्यास

महापुरुषांच्या कौशल्यविषयक कार्याचा, धोरणाचा व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमांमध्ये समावेश केल्यामुळे व्यवसाय शिक्षण अधिक समृद्ध होऊन विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढण्यासही मदत होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर या महापुरुषांच्या कौशल्यविषयक विचारांचा समावेश 'महापुरुषांचे कौशल्य विचार' या पुस्तकात करण्यात आला आहे. आयटीआयच्या सद्या:स्थितीतील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त हा विषय विद्यार्थ्यांना शिकविला जाणार आहे.

### आयटीआयमध्ये ७५ व्हर्चुअल क्लासरूम

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात ७५ व्हर्चुअल क्लासरूम सुरू करण्यात आल्या आहेत. व्हर्चुअल क्लासरूममध्ये इंटरॲक्टिव्ह पॅनल, संगणक सेवा, उत्तम बैठक व्यवस्था असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'स्किल इंडिया' व 'डिजिटल इंडिया' या उपक्रमांअंतर्गत राज्यातील ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व ५४७ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहकार्य करून हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

### रोजगार मेळावे

उद्योजक आणि रोजगार इच्छुक उमेदवारांमध्ये दुवा साधण्यासाठी रोजगार मेळावे आयोजित केले जातात. २०२३-२४ मध्ये एकूण ५८१ रोजगार मेळावे पार पडले. त्यापैकी ३४ महिला रोजगार मेळावे होते. नागपूर,

लातूर, अहमदनगर, बारामती–पुणे, ठाणे येथे पाच नमो महारोजगार मेळावे झाले. या मेळाव्यांमध्ये एक हजार ४९५ उद्योजकांनी सहभाग घेतला, तर एक लाख ५७ हजार १३९ उमेदवार या मेळाव्यांना उपस्थित होते. यामध्ये ६० हजार ६९१ उमेदवारांची नोकरीकरिता निवड करण्यात आलेली आहे.

### छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीर

तरुणांना कौशल्य शिक्षणाचे व रोजगाराचे मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हास्तरावर ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत करिअर मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये १ लाख ७४ हजार ६३८ युवक–युवतींनी आणि १५ हजार ४१३ पालकांनी सहभाग घेतला.

### महाराष्ट्र राज्य नावीन्यपूर्ण स्टार्टअप धोरण २०१८

औद्योगिकतेशी नावीन्यतेची सांगड घालून, महाराष्ट्रातील स्टार्टअप परिसंस्थेच्या विकास व नावीन्यपूर्ण संकल्पनांना, उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाने हे धोरण जाहीर केले. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील नावीन्यपूर्ण परिसंस्थेच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी काम करत आहे.

### स्टार्टअप वीक

स्टार्टअप्सना शासनासोबत काम करण्याची संधी देण्यासाठी व प्रशासनात नावीन्य आणण्यासाठी नावीन्यता सोसायटीतर्फे दरवर्षी 'महाराष्ट्र स्टार्टअप वीक' हा उपक्रम राबावला जातो. या अंतर्गत विजेत्या स्टार्टअप्सना १५ लाखांचे कार्यालयीन आदेश देण्यात येतात. आतापर्यंत झालेल्या पाच आवृत्त्यांच्या १२० विजेत्या स्टार्टअप्सचे काम विविध विभागांसोबत सुरू आहे. दरवर्षी, ग्रँड फिनाले दरम्यान, अव्वल १०० स्टार्टअप्सना स्टार्टअप एक्स्पो–व्हीसी मिक्सर, स्टॉलसाठी जागा उपलब्ध करून दिली जाते. महाराष्ट्र स्टार्टअप वीक ग्रँड फिनालेचा एक भाग म्हणून अखिल भारतीय स्तरावरील स्टार्टअप महासंमेलन आयोजित करण्यात येणार आहे.

### आयटीआयमध्ये रात्र अभ्यासिका

राज्यातील ४१९ आयटीआयमध्ये रात्र अभ्यासिका सुरू करण्यात आल्या आहेत. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पूरक वातावरण निर्माण करून आयटीआय बरोबर इतर संस्थामधील विद्यार्थ्यांनाही याचा लाभ घेता येणार आहे.

### महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ


महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात १८ अभ्यासक्रम शिकवले जातात. विद्यापीठाने विविध उद्योगसमूहांबरोबर ५५ करार केले असून सर्व अभ्यासक्रमांत उद्योग समूह विद्यार्थ्यांना नोकरी करताना प्रशिक्षण देणार आहेत. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्ससाठी एनएसडीसी इंटरनॅशनलबरोबर करार केला असून तिथे जपानी, जर्मन या भाषांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. बिग डेटा, एआय, सायबर सिक्युरिटीवर आधारित एमटेक या अभ्यासक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. विद्यापीठाने या वर्षी युरोपची नामवंत डिझाइन संस्था रुबिकशी करार करून जागतिक दर्जाच्या अभ्यासक्रमांची निर्मिती केली आहे. विद्यापीठाने आय–स्पार्क फाउंडेशनची विद्याविहार येथे स्थापना केली असून यामध्ये नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, मेन्टॉरिंग, सीड फंड देणे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात. विद्यापीठांनी २० महाविद्यालयांत प्री इनक्यूबेशन केंद्रांची स्थापना केली असून १०० नवसंशोधकांनी प्रस्ताव विद्यापीठात सादर केले आहेत.

### संत गाडगेबाबा स्वच्छता अकादमी

स्वच्छ भारत अभियानात कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी ठाण्यात संत गाडगेबाबा स्वछता अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. 'विकास ग्रुप' या कंपनीबरोबर करार करू बीबीए फॅसिलिटी मॅनॅजमेण्ट व इतर प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहेत. तीन महिन्यांत ३०० लाभार्थींनी त्यांचा उपयोग करून घेतला असून त्यांना रोजगार प्राप्त झाला आहे.

**(श्री. लोढा हे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री आहेत.)**

# नव्या धोरणातून पर्यटनाला प्रोत्साहन



● **गिरीश महाजन,** पर्यटन व ग्रामविकास मंत्री

> महाराष्ट्रात पर्यटनाच्या अनंत संधी उपलब्ध आहेत, मात्र अद्याप त्यांचा पुरेपूर वापर करण्यात आलेला नाही. त्यामुळे विविध राज्यांच्या पर्यटन धोरणांतील चांगले मुद्दे स्वीकारून नवे पर्यटन धोरण आखण्यात आले आहे. राज्याला या क्षेत्रात स्वत:चे हक्काचे स्थान मिळवून देण्यासाठी हे धोरण निश्चितच हातभार लावेल.

**महाराष्ट्रातील** पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्याचे पर्यटन धोरण २०२४ तयार करण्यात आले आहे. याद्वारे राज्यात अंदाजे एक लाख कोटींची गुंतवणूक करण्यात येणार असून त्याद्वारे १८ लाख रोजगारांची निर्मिती होणार आहे. यामध्ये १० वर्षांत पर्यटनस्थळे तसेच पायाभूत सुविधा विकसित करून पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण व शहरी भागांत पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून देणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. उच्च दर्जाच्या शाश्वत व जबाबदार पर्यटनास, ग्रामीण व कृषी पर्यटनास चालना मिळावी म्हणून विविध पुरस्कारही देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील लघु, मध्यम, मोठ्या, मेगा, अल्ट्रा मेगा प्रकल्पांना अ, ब, क, गटांमध्ये विभागण्यात आले असून त्यांना गुंतवणूक व रोजगारनिर्मितीच्या आधारे प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पर्यटन घटकांना व्याज परतावा, वस्तू व सेवा कर परतावा, विद्युत शुल्कासह विविध करांमध्ये सवलती देण्याचा या धोरणात समावेश आहे. ग्रामीण भागातील पर्यटन उद्योगांसाठी विभागनिहाय उत्तम होम स्टे,ॲग्रो टुरिझम स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत.

### आई पर्यटन धोरण

महिलांच्या आर्थिक विकासासाठी पर्यटन क्षेत्र चांगले साधन ठरू शकते. या पार्श्वभूमीवर राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आई या महिला केंद्रित पर्यटन योजनेला राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेच्या माध्यमातून महिला उद्योजकता विकास, महिलांकरिता पायाभूत सुविधा, महिला पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य, महिला पर्यटकांसाठी कस्टमाइज्ड उत्पादने, सवलती व प्रवास आणि पर्यटन विकास या पंचसूत्रीचा अवलंब करून महिलांना पर्यटन क्षेत्रात व्यवसाय व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील.

राज्यभरात २१० महिलांना या धोरणाचा लाभ मिळाला आहे.

### कृषी पर्यटन

राज्यातील ग्रामीण भागाचा शाश्वत आर्थिक विकास व्हावा म्हणून ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि पूरक व्यवसाय म्हणून कृषी पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाच्या माध्यमातून शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्धता, स्थानिक पातळीवर रोजगार संधी निर्माण करणे, पर्यटकांना प्रदूषणमुक्त, निसर्गरम्य वातावरणात राहण्याचा व शेतीच्या कामांचा अनुभव देणे ही कृषी पर्यटन धोरणाची उद्दिष्टे आहेत. राज्यभरातून या धोरणासाठी ७०७ पर्यटक घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

### कॅराव्हॅन पर्यटन

राज्यात निसर्गरम्य समुद्रकिनारे, ऐतिहासिक किल्ले, पर्वतरांगा, थंड हवेची ठिकाणे, नदी, वनसंपदा, वारसास्थळे, लेणी, धरणे अशा ठिकाणी कॅराव्हॅन पर्यटनाला वाव आहे. ज्या क्षेत्रात बांधकामास प्रतिबंध आहेत, अशा ठिकाणी कॅराव्हॅन आणि कॅम्परव्हॅनच्या सहाय्याने पर्यटकांना सोयी उपलब्ध करून देऊन पर्यटनवृद्धी साध्य करण्यासाठी कॅराव्हॅन पर्यटन धोरणाला मान्यता देण्यात आली आहे. आठ पर्यटक घटकांना यासंदर्भातील नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

### साहसी पर्यटन

राज्यात जमीन, पाणी, हवेतील साहसी पर्यटनास वाव आहे. साहसी उपक्रम आयोजकांची नोंदणी, सनियंत्रण, नियोजन, प्रोत्साहन, प्रशिक्षण इ. बाबींचा समावेश असलेले साहसी पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. खासगी साहसी पर्यटन आयोजक, आयोजक व्यक्ती, संस्था, वैयक्तिक मालकी, भागीदारीतील व्यवसाय संस्था, धर्मादाय संस्था, हौशी आयोजक, क्लब, सेवा प्रदाते, साहसी पर्यटन संकलक (व्यक्ती आणि संस्था), कॅम्प, रिसॉर्ट, प्रशिक्षण संस्था हे घटक या धोरणांतर्गत नोंदणी करू शकतात. राज्यभरातून या धोरणासाठी ५७६ पर्यटक घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आली आहेत.

### युवा मंडळ

शाळा आणि महाविद्यालयांतून पर्यटन राजदूत तयार करणे ही युवा पर्यटन मंडळाची मूळ संकल्पना आहे. युवा पर्यटन राजदूतांना भारतातील पर्यटनाच्या क्षमतांची जाणीव करून देणे, समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन-संवर्धन करणे आणि पर्यटनाबाबत आवड निर्माण करणे ही यामागची उद्दिष्टे आहेत. युवा पर्यटन मंडळांमधील सहभागामुळे सांघिक भावना, व्यवस्थापन, नेतृत्व यांसारख्या कौशल्य विकासाला मदत होईल. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये आतापर्यंत ६७७ युवा पर्यटन मंडळाची नोंद करण्यात आली आहे.

### आदरातिथ्य

आदरातिथ्य क्षेत्राचे पुनरुज्जीवन करण्यासाठी व पर्यटकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आदरातिथ्य क्षेत्राला औद्योगिक दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली आहे. नोंदणीकृत हॉटेल व्यावसायिकांना वीज दर, विद्युत शुल्क, पाणीपट्टी, मालमत्ता करात सवलत मिळणार आहे. तसेच, नोंदणीकृत हॉटेल व्यावसायिकांकडून औद्योगिक दराने कर व शुल्क आकारणी करण्यात येईल. राज्यभरातून या धोरणासाठी आतापर्यंत १६६ पर्यटक घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

### केंद्र शासनाच्या योजना

**प्रशाद योजना-** तीर्थक्षेत्र जीर्णोद्धार आणि आध्यात्मिक वारसा संवर्धन अभियान (Pilgrimage Rejuvenation and Spiritual Heritage ugmentation Drive - PRSHD) राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांचा विकास करण्यात येणार आहे. यात तुळजापूर येथील महालक्ष्मी मंदिर, खुलताबाद येथील श्री घृष्णेश्वर मंदिर, राजूर येथील महागणपती मंदिर यांचा विकास करण्यात येणार आहे.

**स्वदेश योजना-** केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या 'स्वदेश दर्शन २.०' योजनेत ५७ पर्यटनस्थळांचा समावेश असून त्यात महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग आणि अजिंठा व वेरूळचा समावेश आहे. पर्यटनस्थळांचा प्रचार-प्रसार आणि शाश्वत पर्यटन विकासासाठी योजनेअंतर्गत कामे केली जाणार



आहेत. जागतिक वारसास्थळ असलेल्या वेरूळ आणि अजिंठा लेणींच्या परिसरात विकासकामे करून शाश्वत पर्यटन विकासावर केंद्र सरकारने भर दिला आहे.

गेल्या दोन वर्षांत देशातील पर्यटनदृष्ट्या अग्रेसर असलेल्या राज्यांच्या पर्यटन धोरणांचा अभ्यास करण्यात आला आणि प्रत्येक धोरणातील चांगल्या मुद्द्यांचा समावेश महाराष्ट्राच्या पर्यटन धोरणात करण्यात आला. पर्यटन धोरण २०२४ हे देशातील सर्वोत्कृष्ट पर्यटन धोरण ठरेल अशी आमची अपेक्षा आहे. या धोरणाच्या माध्यमातून एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. भांडवली गुंतवणुकीवर अनुदान देण्यात येणार आहे. अतिरिक्त एफएसआय देण्याची तरतूद असून त्यासाठी प्रीमियम आकारला जाणार नाही. टुर ऑपरेटर व डेस्टिनेशन वेडिंग ऑपरेटरला प्रोत्साहन देणे प्रस्तावित आहे. कर्जावरील व्याजात सवलतीची तरतूद आहे. आदरातिथ्य क्षेत्रास औद्योगिक दर्जा देण्यात आला आहे. स्टॅम्प ड्युटीमध्ये सूट, एसजीएसटी परतावा, विद्युत शुल्कात सवलत, वाढीव एफएसआय इ. बाबींचा समावेश या धोरणात आहे. या पर्यटन धोरणामध्ये राज्यातील लघु, मध्यम, मोठे, मेगा, अल्ट्रामेगा प्रकल्पांना अ, ब, क गटात विभागण्यात आले आहे. खासगीकरणाच्या माध्यमातून देखील पर्यटन स्थळांचा विकास करण्यात येणार आहे.

स्कूबा डायव्हिंगला चालना देण्यासाठी तारकर्ली येथे एक केंद्र उभारले जात आहे. सोलापूर येथे हॉटेल मॅनेजमेंट व टुरिझम मॅनेजमेंटचे शिक्षण देणारे महाविद्यालय स्थापन करण्यात येणार आहे. सागरी पर्यटन व क्रुझ पर्यटनासदेखील चालना देण्यात येत आहे. संस्कृती व पर्यटनस्थळांना चालना देण्यासाठी विविध महोत्सव आयोजित करण्यात येत आहेत. विदर्भात चिखलदरा महोत्सव, नागपूर महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सवही थाटामाटात होणार आहे. 'डेस्टिनेशन' टुरिझम अंतर्गत राज्यातील १० पर्यटनस्थळांचा विकास करण्यात येत आहे. पहिला पर्यटन जिल्हा ठरलेल्या सिंधुदुर्गात अद्याप एकही पंचतारांकित हॉटेल नाही. जवळच्या गोव्यात मात्र २७ पंचतारांकित हॉटेल्स आहेत. गोव्यापेक्षाही सुंदर किनारे सिंधुदुर्गात आहेत. तथापी गोव्याएवढे पर्यटक येत नाहीत. यावर उपाय म्हणून सिंधुदुर्गात वेंगुर्ला येथे फोमेंटो हे पहिले पंचतारांकित हॉटेल लवकरच सुरू करण्यात येणार आहे. ताज समुहाच्या पंचतारांकित हॉटेलचे भूमिपूजन लवकरच करण्यात येणार आहे. आज रोजी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळा मार्फत चालविण्यात येणाऱ्या ३१ रिसॉर्ट्सपैकी एकही पंचतारांकित नाही. त्यामुळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे रिसार्टस् खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. लवकरच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे सर्व रिसॉर्टस हे फाईव्ह स्टार/ फोर स्टार/ थ्री स्टार दर्जाचे होतील.

राज्यातील पर्यटन स्थळांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पाळीवर प्रसिद्धीची व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे. महाराष्ट्राला विशेष पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याची क्षमता या नवीन पर्यटन धोरणात आहे. गरज आहे ती आपण या पर्यटन धोरणांमधील सवलतींचा फायदा घेण्याची व पर्यटनाला चालना देण्याची! ■

# 'मेक इन इंडिया'ची 10 वर्षे

मेक इन इंडिया १५ ऑगस्ट, २०२४ रोजी लाल किल्ल्याच्या बुरुजावरून आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्येच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले हे आवाहन, अंत्योदयचे प्रणेता पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंती दिनी- २५ सप्टेंबर, २०१४ रोजी मेक इन इंडियाच्या उपक्रमाच्या स्वरूपामध्ये सर्वांच्या समोर आहे. आणि गेल्या दहा वर्षांमध्ये ही केवळ घोषणाच राहिली नाही, तर समाजातील सर्व लोकांची एक जबाबदारी बनली आहे. आज भारतामध्ये विक्रमी परदेशी गुंतवणूक होत आहे.




**'मेक इन इंडिया!** हा या दशकामध्ये असा एक स्वतंत्र ब्रँड तयार झाला आहे. या ब्रँडने संपूर्ण विश्वाला जणू अचंबित केले आहे. स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला औद्योगिक महाशक्ती बनविण्याचे पाहिलेले स्वप्न, या दोन्ही गोष्टी भारतासाठी 'मेक इन इंडिया 'मागची प्रेरणा आहेत. भारत आज प्रत्येक क्षेत्रामध्ये नवनवीन आयाम जोडत आहे आणि आता केवळ उपभोगासाठी, ग्राहकांसाठी असलेली बाजारपेठ म्हणजे भारत राहिलेला नाही, तर वेश्शविक उत्पादनाचे केंद्र बनत आहे. त्याचबरोबर, साकार होत आहे, भारताचे असे काही स्वप्न की, जो भारत आत्मनिर्भर आणि विकसित असेल...

किस्सा आहे गुलामगिरीच्या कालखंडातला. स्वामी विवेकानंदजी आणि जमशेदजी टाटा यांच्यात संभाषण आणि पत्रव्यवहार झाले. त्यावेळी जवळपास ३० वर्षांचे तरुण स्वामी विवेकानंद जमशेदजी टाटांसारख्या व्यक्तीला म्हणाले – भारतात उद्योग सुरू करा ना, 'मेक इन इंडिया बनवा ना'. स्वतः जमशेदजी टाटा यांनी लिहिले आहे की स्वामी विवेकानंदांचे ते शब्द आणि ती वाक्ये माझ्यासाठी प्रेरणादायी होती. म्हणूनच मी या भारतात भारतीय उद्योग उभारण्यासाठी गेलो होतो. दुसरा आहे नंतरच्या कालखंडातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या ओद्योगिकीकरणा बाबतचे विचार. अनेक वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या औद्योगिकीकरणा विषयी सांगितले होते. त्यांच्यासाठी उद्योग हे एक असे

प्रभावी माध्यम होते ज्यामध्ये गरिबातील गरीब लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला जाऊ शकतो. आज देशात 'मेक इन इंडिया' मोहीम यशस्वीपणे सुरू असताना डॉ.आंबेडकरांनी औद्योगिक महासत्तेच्या रुपातील भारताचे जे स्वप्न पाहिले होते– त्यांची तीच दूरदृष्टी आज राष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे.

अर्थात शतकानुशतकांच्या तपशचर्येतून निघालेल्या गोष्टी... ज्यात या देशाच्या प्रत्येक माणसाने काही ना काही भर टाकली आहे. असेही सांगितले जाते– जे इतिहासातून धडा घेत नाहीत, ते इतिहासात हरवून जातात. स्वातंत्र्यानंतर बराच काळ अशा प्रकारचे सुनियोजित उपक्रम नव्हते. एवढेच नव्हे तर २०१४ पूर्वी तर असे वातावरण निर्माण झाले होते की, व्यवसाय येथून दुसरीकडे हलवायचा आहे, उद्योग इथून हलवायचा आहे. पण पंतप्रधानपदाची धुरा सांभाळल्यानंतर नरेंद्र मोदींनी ही समस्या विचारात घेतली आणि मुख्यमंत्री या नात्याने त्यांचा गुजरातचा अनुभव आणि 'मेक इन इंडिया'च्या अनोख्या उपक्रमाने त्यांनी अतिरिक्त विश्वास दिला. असे वातावरण निर्माण करण्यात आले की एकाही उद्योगपतीला नाईलाजाने देश सोडावा लागू नये. केंद्र सरकारने एका दशकापूर्वी सुरू केलेली 'मेक इन इंडिया' मोहीम ही २१व्या शतकातील भारताची गरज बनली आहे आणि





**ज्यावेळी जग ओद्योगिक क्रांतीच्या कालखंडात होते, त्यापूर्वी आपल्याला सोने की चिडिया? म्हणजे अतिशय समृद्ध देश म्हणून ओळखले जात होते. मात्र, ज्यावेळी जग औद्योगिक क्रांतीच्या पायऱ्या चढू लागले तेव्हा आपण मागे पडलो. का? आपण गुलाम होतो. ती संधी आपण गमावली. त्यानंतर आर्थिक चैतन्याचे एक नवे युग नवी संधी आली. आता आपली ही जबाबदारी आहे की याला भारताचे युग कसे बनवायचे? एक अशी संधी आली आहे आणि आपल्याकडे सर्वात मोठे सामर्थ्य आहे की आपली ६५ % लोकसंख्या ३५ वर्षाच्या आतील आहे.**

**– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

जगाला आपले सामर्थ्य दाखवण्याची संधीही देते. 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया'च्या स्वप्नांसह २१व्या शतकातील नवा भारत आगेकूच करत आहे.

याचाच हा परिणाम आहे की आज भारतात सर्वाधिक विक्रमी परदेशी गुंतवणूक होत आहे. परदेशात राहणारे भारतीयही खूप मोठ्या प्रमाणात भारतात पैसे पाठवत आहेत. विविध देशांचे मानांकन करणाऱ्या एजन्सी आणि संस्था चकित झाल्या आहेत, मेक इन इंडिया हा असा ब्रँड बनला आहे की संपूर्ण जग थक्क झाले आहे. आज भारत डिजिटल आघाडीवरही जागतिक नेता म्हणून उदयास येत आहे. भारत जागतिक डिजिटल क्रांतीचे केंद्र बनत आहे. किंबहुना, यामागील कारक आहे – पंतप्रधान मोदींचे





जीडीपी प्लस कल्याण मॉडेल, जे प्रत्यक्षात सक्षम भारतासाठी एक जबरदस्त तोडगा आहे – एक असा भारत जो स्वावलंबी आणि विकसित असेल.

'मेक इन इंडिया' चा उपक्रम २५ सप्टेंबर २०१४ रोजी सुरू झाला होता, ज्या दिवशी अंत्योदयाचे प्रणेते आणि जगाला अखंड मानवतेचे दर्शन देणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती होती. अशा महापुरुषाच्या आदर्शांनी आणि विचारांनी प्रेरित होऊन पुढे जात, नवीन भारताने 'मेक इन इंडिया' उपक्रम राष्ट्राला समर्पित केला. गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, नवोन्मेषाला चालना देणे, सर्वोत्कृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि भारताला उत्पादन, डिझाइन आणि नवनिर्मितीचे केंद्र बनवणे हा यामागचा उद्देश आहे. 'वोकल फॉर लोकल'चा हा एक अनोखा उपक्रम आहे ज्याने भारताच्या उत्पादन क्षेत्राला जगात सादर केले.

देशांतर्गत आणि विदेशी थेट गुंतवणुकीला (एफडीआय) प्रोत्साहन देण्यासाठी विविध मंत्रालये, राज्य सरकारे आणि परदेशातील भारतीय मिशनद्वारे गुंतवणुकीबाबत जागरूकता वाढवली जात आहे. सध्या, मेक इन इंडिया २.०, विविध मंत्रालये, विभाग आणि राज्य सरकारांच्या अंतर्गत २७ क्षेत्रांवर केंद्रित आहे.

आज भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिक आशावाद आणि आत्मविश्वास दिसून येत आहे. आज भारताकडे खुलेपणा, संधी आणि निवडी यांचा संयोग म्हणून पाहिले जात आहे. गेल्या १० वर्षात भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. केंद्र सरकारच्या सततच्या प्रयत्नांचे हे फळ आहे. २०१४ मध्ये सुधारणा, प्रदर्शन आणि परिवर्तन म्हणजेच 'रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्म'चा प्रवास सुरू करून गेल्या १० वर्षांत स्पर्धात्मकता आणि पारदर्शकता वाढवण्यात आली. डिजिटलायझेशन विस्तारले आहे आणि नबोन्मेषाला चालना मिळाली आहे. लाल फितीच्या कारभारापासून रेड कार्पेटकडे आणि उदारीकृत एफडीआयच्या प्रवाहाच्या दिशेने वळवले गेले आहे. 'मेक इन इंडिया' आणि आत्मनिर्भर भारत यांसारख्या

**भारताला तीन 'डी'चे भाग्य लाभले आहेत. हे आहेत: डेमोक्रेसी म्हणजे लोकशाही, डेमोग्राफी म्हणजे लोकसंख्या आणि डिमांड म्हणजे मागणी, यामध्ये आम्ही आणखी एका डी– डिरेग्युलेशन म्हणजे विनियमनची भर घातली आहे. आजचा भारत अशा प्रकारचा चार आयामवाला भारत आहे. आपल्या न्यायिक प्रणाली स्वतंत्र आणि काळाच्या कसोटीवर खऱ्या उतरल्या आहेत. दुसऱ्या कोणत्याही देशात ही सवथ तत्वे आढळणार नाहीत. हा भारतात असण्याचा सर्वात चांगला कालखंड आहे आणि त्याहीपेक्षा चांगला 'मेक इन इंडिया' असण्याचा आहे.**

**– पंतप्रधान नरेंद्र मोदी**




**भारतीय अर्थव्यवस्थेत आपल्याला ज्या प्रकारचा बदल घडवून आणायचा आहे, त्या बदलात एकीकडे आपल्याला Manufacturing Growth वाढवायची आहे, त्याच वेळी त्याचा थेट फायदा भारतातील तरुणांना मिळावा, त्यांना रोजगार मिळावा जेणेकरून गरिबातील गरीब कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत बदल होईल. ती गरिबीतून Middle Class च्या दिशेने वळतील. त्यांची Purchasing Power वाढली तर Manufacturer ची संख्या वाढेल. Manufacturing Growth वाढेल, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, पुन्हा एकदा बाजार वाढेल. हे चक्र पुढे सुरू राहण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे काम करण्यात आले आहे. हे सिंहाचे पाऊल आहे. ही Lion ची Step आहे.**

**– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

उपक्रमांनी उत्पादनाला चालना दिली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, केंद्र सरकारने धोरणात्मक स्थिरता आणली, ज्यामुळे भारत पुढील काही वर्षांत तिसरी सर्वात मोठी जागतिक अर्थव्यवस्था बनू शकेल. केंद्र सरकार नवा मार्ग स्वीकारण्याविषयी वचनबद्ध आहे, ज्या अंतर्गत औद्योगिक आस्थापनांना संपूर्ण सहकार्य केले जाते. नियामक आणि धोरणात्मक समस्यांशी संबंधित सर्व पैलूंवर परदेशी गुंतवणूकदारांना सर्वप्रथम 'इन्व्हेस्ट इंडिया' मार्गदर्शन करते. नियामक मंजुरी मिळविण्यात देखील ती मदत करते. सरकार सर्व नियामक प्रक्रियांवर बारकाईने लक्ष ठेवते, त्या सुलभ करण्यासाठी तसेच त्यांचे पालन करण्यासाठी गुंतवणूकदारांवर पडणारा भार कमी करण्याच्या उद्देशाने. 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत, नाविन्यपूर्ण आणि नवीन तंत्रज्ञानामध्ये आघाडीवर असलेल्या निवडक देशांतर्गत कंपन्यांवरही लक्ष केंद्रित केले जात आहे. या कंपन्यांचे जागतिक चॅम्पियन्समध्ये रूपांतर करणे हा त्याचा उद्देश आहे. याअंतर्गत पर्यावरणपूरक आणि उन्नत निर्मितीला चालना देण्यावर भर दिला जाणार आहे. यासोबतच या कंपन्यांना जागतिक मूल्य साखळीचा महत्त्वाचा भाग बनण्यास मदत केली जाते.

### उत्पादनाचे ऊर्जा गृह बनत आहे भारत

'मेक इन इंडिया' आज भारतातील सर्वात मोठा उपक्रम–मोहीम बनला आहे. आज भारत जगातील पहिल्या सहा उत्पादक देशांमध्ये आहे. धोरणात्मक निर्णय असो किंवा सामान्य अर्थसंकल्प, प्रत्येक वेळी आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडियासाठी अनेक महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तरुण आणि प्रतिभावान लोकसंख्येचे लोकसंख्याशास्त्रीय लाभांश, लोकशाही व्यवस्था, नैसर्गिक संसाधने यासारख्या सकारात्मक घटकांच्या बळावर निर्धाराने मेक इन इंडियाकडे वाटचाल करण्यासाठी लोकसंख्येला प्रोत्साहित केले जात आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून याकडे पाहिले तर आत्मनिर्भरता अधिक महत्त्वाची आहे. आज संपूर्ण जग भारताकडे मॅन्युफॅक्चरिंग पॉवर हाऊस म्हणून पाहत आहे. त्यामुळे, आपल्याला आपल्या कंपन्यांच्या उत्पादनांचा अभिमान असण्याची गरज आहे आणि आपल्या भारतीय ग्राहकांमध्येही अभिमानाची भावना निर्माण केली पाहिजे. कंपन्यांना त्यांच्या उत्पादनांमध्ये जागतिक दर्जा राखावा लागेल आणि जागतिक स्तरावर स्पर्धेत पुढे जावे लागेल.

भारताच्या जीडीपीमध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा १५ टक्के आहे. म्हणजे 'मेक इन इंडिया'साठी अनंत शक्यता आहेत. केंद्र सरकार असो, राज्य सरकार असो, स्थानिक राज्य सरकारचे नियम असोत, खाजगी भागीदारी असो, कॉर्पोरेट असो, सर्वांनी मिळून देशासाठी कसे काम केले पाहिजे. आज देशात ज्याची गरज आहे. ज्यांची मागणी वाढत आहे, त्यामुळे मेक इन इंडियाला चालना मिळत आहे. ■

# रस्ते बांधणीमध्ये कच-याच्या वापरामुळे स्वच्छता अभियानाला हातभार




**केंद्रीय** रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिल्ली–मुंबई, ढोलेरा–अहमदाबाद तसेच इतर राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीमध्ये कचऱ्याचे विलगीकरण करून कंत्राटदारांना या कचरा सामग्रीचे रस्ते बांधणीत वापर करण्याचे सांगितले असून आतापर्यंत ८० लाख टन कचऱ्याचा वापर रस्ते बांधणीत करण्यात आला आहे. यामुळे पर्यायाने कचऱ्याची विल्हेवाट लागून स्वच्छता अभियानाला हातभार लागत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त नागपूर महानगरपालिकेद्वारे वारसास्थळ असलेल्या कस्तुरचंद पार्क येथे आयोजित श्रमदान कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी महानगरपालिकेचे आयुक्त डॉक्टर अभिजीत चौधरी, आतिरिक्त आयुक्त आँचल गोयल उपस्थित होते. नागपूर महानगरपालिका ही सांडपाण्यावर प्रक्रिया करून हे पाणी, वीज निर्मिती करिता औष्णिक प्रकल्पाला देणारी पहिली महानगरपालिका ठरली असून पेंच, कोराडी, खापरखेडा या प्रकल्पातील राखीव पाणी आता शेतकऱ्यांना सिंचनासाठी उपलब्ध होत असून सांडपाण्यावरच प्रक्रिया करून हे पाणी आता नागपूर महानगरपालिकेतील उद्यानासाठी वापरता येणार आहे असे देखील गडकरी यांनी सांगितले. पूर्व नागपूरच्या भांडेवाडी येथील कचरा डेपोतील पार्टिकल वर प्रक्रिया करून त्यामार्फत जैव खतांची निर्मिती सुद्धा आता होत असून या जैव खतांचा वापर केल्याने पिकाच्या उत्पादनामध्ये वाढ होते आणि ही खते रासायनिक खतांना पर्याय ठरतात असे त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. जैवभारापासून, कचऱ्यापासून बायो सीएनजी निर्मिती शक्य असून महानगरपालिकेने आपल्या ताफ्यातील वाहने ही पेट्रोल–डिझेलवर ऐवजी सीएनजी, बायो एलएनजी अशा अपारंपारिक इंधनांवर संचलित करावी अशी सूचना गडकरींनी दिली. स्वच्छतेचे महत्व सांगताना त्यांनी स्वतः स्वच्छतेच्या चांगल्या सवयी आत्मसात करण्याचे आवाहन नागरिकांना केले.

यावेळी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की नागपूर महानगरपालिकेद्वारे ६० शौचालयांचं बांधकाम शहरात चालू असून यापैकी ३ स्मार्ट शौचालयाचे लोकार्पण गडकरींच्या हस्ते झाले. महानगरपालिका आत्मनिर्भर वार्ड, स्वच्छ वार्ड, वर्टीकल गार्डनच्या माध्यमातून शहराचे सुशोभीकरण यासारख्या उपक्रमांमधून स्वच्छता अभियानाच्या या उपक्रमामध्ये निरंतर कार्यरत राहील, असे आश्वासन चौधरी यांनी यावेळी दिले. ■

# कृषी क्रांती, कृषी स्वावलंबन योजनेतील विहिरीला आता चार लाखांचे अनुदान



**राज्यातील** अनुसूचित जमातीसाठी राबविल्या जात असलेल्या बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना तसेच अनुसूचित जाती-नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी राबविल्या जात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेच्या आर्थिक निकषांमध्ये सुधारणा तसेच नवीन घटक समाविष्ट करण्यात आले आहेत. या योजनांमधून घेतल्या जाणाऱ्या नवीन सिंचन विहिरींसाठी आता चार लाखांचे अनुदान मिळू शकणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजनेतून नवीन विहिर घेणाऱ्या पात्र लाभार्थी शेतकऱ्याला चार लाख तसेच जुनी विहिर दुरुस्ती घटकासाठी एक लाखांचे अनुदान मिळू शकणार आहे. शेततळ्यासाठी प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी खर्चाच्या ९० टक्के किंवा दोन लाख रुपये यापैकी जे कमी असेल ते मिळतील. इनवेल बोअरिंगसाठी ४० हजार, वीज जोडणीसाठी २० हजार किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते मिळेल.

१० अश्वशक्तीपर्यंत क्षमतेच्या पंपसंचासाठी खर्चाच्या ९० टक्के किंवा ४० हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान मिळू शकेल. सौरपंप जोडणीसाठी खर्चाच्या ९० टक्के किंवा ५० हजार यापैकी जे कमी असेल ते, एचडीपीई-पीव्हीसी पाईपसाठी खर्चाच्या १०० टक्के किंवा ५० हजार, तुषार सिंचन संचासाठी खर्चाच्या ९० टक्के किंवा ४७ हजार, ठिबक संचासाठी खर्चाच्या ९० टक्के किंवा ९७ हजार, ट्रॅक्टरचलीत अवजारासाठी ५० हजार, परसबागेसाठी ५ हजार रुपये अनुदान मिळणार आहे.

या योजनेसाठी पात्र लाभार्थ्याला नवीन विहिरीसाठी ४ लाख, जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी एक लाख रुपये अनुदान मिळू शकेल. शेततळ्याच्या प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी खर्चाच्या ९० टक्के किंवा २ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान मिळेल. बोअरिंगासाठी ४० हजार, वीज जोडणीला किमान २० हजार, विद्युत पंपसंचासाठी १० अश्वशक्तीपर्यंत खर्चाच्या ९० टक्के किंवा ४० हजार रुपये, सौरपंपासाठी खर्चाच्या ९० टक्के किंवा ४० हजार यापैकी जे कमी असेल ते मिळेल. तुषार संचासाठी ४७ हजार किंवा खर्चाच्या ९० टक्के तर ठिबक संचासाठी ९७ हजार किंवा खर्चाच्या ९० टक्के जे कमी असेल ते अनुदान मिळेल. यंत्रसामुग्री (बैलचलीत, ट्रॅक्टर चलित अवजारे) साठी ५० हजार रुपये मिळतील. या योजनेतून नवीन विंधन विहिरीसाठी ५० हजार किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते अनुदान मिळेल.

### ...हे झाले महत्त्वाचे बदल

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत नवीन विहिरीबाबत चार लाख अनुदान मर्यादेपर्यंत विहिरीची खोली १२ मीटर खोलीची अट रद्द करण्यात येत आहे. दोन सिंचन विहिरींमधील ५०० फूट अंतराची अट रद्द करण्यात आली आहे. नवीन विहिर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांस २० वर्षानंतर जुनी विहिर दुरुस्ती घटकाचा लाभ देण्यात यावा. कृषी स्वावलंबन योजनेतही १२ मीटर खोलीची अट रद्द केली आहे. दोन सिंचन विहिरीतील ५०० फूट अंतराची अट रद्द केली आहे. प्लॅस्टिक अस्तरीकरण घटकाचा लाभ मागेल त्याला शेततळे योजनेबरोबरच इतर योजनेअंतर्गत शेततळ्याचा लाभ घेण्यात आलेल्या तसेच स्वखर्चाने शेततळे केलेल्या शेतकऱ्यांनाही देखील अनुज्ञेय असेल. ■

## नॉन क्रीमीलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची केंद्राला विनंती

नॉन क्रीमीलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची विनंती केंद्र शासनाला करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्यासंदर्भात ( नॉन-क्रीमीलेअर) उत्पन्नाची मर्यादा आठ लाखांवरून पंधरा लाख रुपये इतकी करण्याची शिफारस केंद्र शासनास करण्यात येईल.

# २४ जिल्ह्यात दुपदरी सिमेंट काँक्रिट रस्ते होणार

## बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भूमीपूजन

**आशियाई** विकास बँक अर्थसहाय्यित (एडीबी) महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प टप्पा-३ अंतर्गत राज्यातील २४ जिल्ह्यातील रु. १२ हजार ७६८ कोटी रूपये किंमतीच्या १४८० कि.मी. लांबीच्या दुपदरी सिमेंट काँक्रिट रस्त्यांचे भूमिपूजन एकाच वेळी त्या-त्या ठिकाणी पार पडले. मुख्य भूमिपूजन समारंभ दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा पाटणकर म्हैसकर, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दिक्षित, यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी २०१८ मध्ये राज्य शासनाकडून ए.डी.बी. अर्थात आशियाई विकास बँकेकडून अर्थसहाय्य घेण्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला. आशियाई विकास बँक प्रकल्पाच्या पहिल्या तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये एकूण ९१९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली. त्यापैकी ४५० कि.मी. लांबीचे रस्ते पूर्ण झाले असून उर्वरित ४६९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून ७५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

एडीबीच्या माध्यमातून होणारी ही कामे जिल्हानिहाय असून २४ जिल्ह्यातील एकूण ४४ मतदार संघातील कामे त्यात समाविष्ट आहेत. या कामांच्या जाहीर निविदा प्रक्रिया आणि ठेकेदार निश्चिती करण्यात आली असून लवकरच ही कामे सुरू होतील. या रस्त्यांमुळे तेथील गावांमधील नागरिकांचा रोजचा प्रवास सुखकर होणार आहे. तसेच औद्योगिक आणि कृषी क्षेत्रातील वाहतूक सोयीची होणार आहे. तसेच धार्मिक स्थळे आणि पर्यटन स्थळे चांगल्या दर्जाच्या रस्त्यांनी जोडली जाणार आहेत. त्यामुळे नवीन उद्योग निर्मिती होऊन स्थानिक नागरिकांसाठी रोजगार उपलब्ध होणार आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी रस्त्याच्या दुतर्फा अंदाजे ३ लाख झाडे लावण्यात येणार आहेत. तसेच या प्रकल्पांतर्गत बंधाऱ्यावरील पूल बांधण्यात येणार



आहेत. त्यामुळे लगतच्या भागातील पाण्याची पातळी उंचावण्यास मदत होणार आहे. रस्त्याच्या भागातील शाळांमध्ये शालेय विद्यार्थिनींसाठी स्वच्छतागृहांचे बांधकाम करण्यात येणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी बस निवारे बांधण्यात येणार आहेत.भूजल पातळी वाढविण्यासाठी पाईप मोऱ्यांच्या ठिकाणी जलपुनर्भरण व्यवस्था उभारण्यात येणार आहे.

## कृषी विद्यापीठात प्रकल्पग्रस्तांची भरती करणार

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या प्रकल्पग्रस्तांमधून 'क' आणि 'ड' संवर्गातील पद भरतीसाठी निर्बंध शिथील करून मान्यता देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. एक विशेष बाब म्हणून ही मान्यता देण्यात येत असून, पन्नास टक्के पदे ही त्याच विद्यापीठांच्या बाधित प्रकल्पग्रस्तांकरिता राखीव ठेवण्यात येतील. चारही कृषी विद्यापीठांत तीन हजार २३२ हेक्टर जमीन अधिग्रहीत करण्यात आली असून, यामुळे बाधित झालेल्या कुंटुंबातील पात्र उमेदवाराची यात भरती करण्यात येईल. ही विशेष भरती प्रक्रिया राबविताना सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिकेचा निर्णय, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याची सांगड घालण्यात येईल.

# मुंबईतल्या पाच प्रवेश मार्गांवर हलक्या वाहनांना टोल माफ



**मुंबईतल्या** पाच प्रवेश मार्गांवरील पथकर (टोल) हलक्या वाहनांसाठी माफ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. १४ ऑक्टोबरपासून याची अंमलबजावणी होईल. हलकी वाहने, शाळेच्या बसेस आणि एसटी बसेस यांना ही पथकरातून सूट राहील. सायन पनवेल महामार्गावर वाशी येथे, लालबहादूर शास्त्री रस्त्यावर मुलुंड येथे, पूर्व द्रुतगती मार्गावर मुलुंड येथे ऐरोली पुलाजवळ, पश्चिम द्रुतगती मार्गावर दहिसर येथील पथकर नाक्यावर याची अंमलबजावणी होईल. पथकरातून सूट दिल्यामुळे राज्य रस्ते विकास महामंडळास द्याव्या लागणाऱ्या भरपाईसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

## राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये पाळणाघरे सुरू करणार

राज्यातील अंगणवाड्यांमध्ये ३४५ पाळणाघरे सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या पाळणघरांमध्ये पाळणा सेविका, पाळणा मदतनीस अशी प्रत्येकी एक पदे निर्माण करण्यात येतील. यासाठी साठ टक्के खर्च केंद्र तर चाळीस टक्के खर्च राज्य शासन करेल.

## केंद्राची ॲग्रिस्टॅक योजना राज्यात राबवणार

राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची ग्रिस्टॅक डिजिटल ग्रिकल्चर मिशन योजना राज्यात राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत माहिती निर्मिती कक्ष, शेतकरी माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच आणि भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे माहिती संच महसूल विभाग तयार करेल. यासाठी माहिती वापर कक्षाची स्थापना कृषि विभाग करेल. या साठी सुकाणू समिती, अंमलबजावणी समिती, क्षेत्रिय स्तरावर विभागस्तरीय, जिल्हास्तरीय समिती आणि तालुकास्तरीय समिती गठित करण्यात येतील. पिकांच्या माहिती संचासाठी तिन्ही हंगामात मिळून सुमारे ८१ कोटी ८३ लाख रुपये खर्च दरवर्षी येईल.

## नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवणार

या प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, धाराशीव, लातूर, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, जळगाव व नाशिक या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित सहा हजार कोटी रुपयांच्या नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या टप्पा दोन मध्ये समाविष्ट करण्यासाठी गावांसाठीचे निकष निर्धारित करुन

पाक्षिक प्रदेश बीजेपी मनोगत

त्यानुसार गावांच्या निवडीबाबतची प्रक्रिया पूर्ण करुन निवड केलेल्या एकूण ६९५९ गावांच्या यादीस मान्यता देण्यात आली आहे. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा दोनसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापन करण्यात आली आहे.

## बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राला ७०९ कोटींचा अतिरिक्त निधी

याकेंद्रासाठी मंजूर अतिरीक्त निधी टप्पेनिहाय वितरीत करण्यात येणार आहे. हळदीवरील संशोधनासाठी तसेच निर्यातक्षम उत्पान बनवण्यासाठी हे केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

## सिडको, 'पीएमआरडी'ला दिलेले भूखंड गृहनिर्माण संस्थाच्या मालकीचे

सिडको महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिलेले भूखंड कब्जेहक्काने रुपांतरीत करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यामुळे अनेक गृहनिर्माण संस्था या जागेच्या मालक होणार असून, त्यांना नाहरक प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही. नागरिकांना सोयीचे व्हावे म्हणून शासनाने हे भूखंड एकरकमी विहीत शुल्क आकारून भाडेपट्ट्यांऐवजी कब्जे हक्काने वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे.

## नवीन महाविद्यालयांसाठी अर्जाची मुदत वाढवली

नवीन महाविद्यालये, नवीन अभ्यासक्रम तसेच अतिरिक्त तुकड्यांसाठी अर्ज करण्याची मुदत वाढविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. विद्यापीठांच्या कुलसचिवांकडे अर्ज करण्याची मुदत सप्टेंबर अखेरपर्यंत होती. ३१ ऑक्टोबरपर्यंत विहीत नमुन्यात अर्ज करता येतील. याशिवाय अथर्व विद्यापीठ मुंबई, इंदिरा विद्यापीठ पुणे व नयनता विद्यापीठ पुणे या विद्यापीठांच्या नावांचा समावेश अनुसूचीमध्ये करण्यास मान्यता देण्यात आली.

## शासकीय रुग्णालयांमध्ये सुलभ शौचालयांची व्यवस्था

राज्यातील रुग्णालयांमध्ये सुलभ शौचालय, स्नानगृह संकुल व राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. राज्यातील २०० खाटांची बारा आणि १०० खाटांची पंचेचाळीस अशा एकूण ५७ आरोग्य संस्थांमध्ये सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन, मुंबई यांच्यामार्फत शौचालय, स्नानगृह संकुल व राहण्याची सुविधा देण्यात येईल.

## वांद्रे शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा देणार

वांद्रे शासकीय वसाहतीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती ही जागेबाबतची निश्चित करणे, सदस्य संख्या निश्चित करणे तसेच इतर कार्यपद्धती ठरवणे याबाबत निर्णय घेईल.

## पत्रकार, वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळे

राज्यातील पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या दोन्ही घटकांची महामंडळ स्थापन करावी, अशी आग्रही मागणी होती. पत्रकार, तसेच वृत्तपत्र विक्रेंत्याच्या कल्याणासाठीच्या विविध योजना या महामंडळांमार्फत चालवण्यात येतील.

## आपले सरकार केंद्र चालकांना ग्रामरोजगार सेवकांप्रमाणे मानधन

आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पामुळे पंचायत राज संस्थांचा कारभार संगणीकृत होऊन ई– पंचायत प्रकल्पांतर्गत अभिपेत असलेली एकसुत्रता आणि पारदर्शकता आणणे शक्य झाले आहे.

# उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्याच्या नदी जोड प्रकल्पाकरीता १५ हजार ७०० कोटी

दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेस तसेच दमणगंगा वैतरणा गोदावदी नदी जोड योजनेस मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. दमणगंगा-एकदरे-गोदावरी या योजनेतून मराठवाड्यातील १० हजार ११ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होईल. तसेच ६८.७८६ दलघमी पाणी सिंचनासाठी, १३.७६ दलघमी पाणी पिण्यासाठी आणि ९.१७ दलघमी पाणी उद्योगासाठी उपलब्ध होणार आहे. यापूर्वी दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी कोकणातून पाणी वळविण्याच्या योजनांना मान्यता देण्यात आली आहे. आंतरराज्यीय  दमणगंगा-पिंजाळ, नदीजोड प्रकल्प व नारपार गिरणा नदी योजना, पार-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या नदीजोड प्रकल्पांना राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून



२१३ कोटी रुपये आहे. दमणगंगा वैतरणा गोदावरी नदी जोड योजनेच्या १३ हजार ४९७ कोटी २४ लाख किंमतीच्या प्रकल्पास देखील मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प दमणगंगा आणि वैतरणा उपखोऱ्यातील ५.६८ टीएमसी अतिरिक्त पाणी स्थानिक वापरासाठी तसेच नाशिक जिल्ह्यातील अवर्षणप्रवण सिन्नर तालुका आणि मराठवाड्यातील जायकवाडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्राला याचा लाभ होईल.

## पुणे: स्वारगेट-खडकवासला 'मेट्रो'ला मान्यता

पुणे मेट्रो रेल टप्पा-२ मधील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या टप्प्यातील खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला व नळ स्टॉप- वारजे-माणिकबाग या प्रकल्पांचे महत्त्व लक्षात घेऊन या मेट्रो मार्गांना मान्यता देण्यात आली. या मार्गिकांची एकूण लांबी ३१.६३ कि.मी. असून २८ उन्नत स्थानके आहेत. यासाठी ९ हजार ८१७ कोटी १९लाख रुपये खर्चाच्या प्रकल्पास महामेट्रोमार्फत अंमलबजावणी करण्यास देखील मान्यता देण्यात आली.

## अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ

अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याचा लाभ ४२ हजार ८४२ शेतकऱ्यांना होईल. सध्या राज्यात २ हजार ६५९ उपसा सिंचन सहकारी संस्था असून २६१ संस्थांकडे बँकांची थकबाकी आहे. या संस्थांपैकी १४४ संस्था सध्या सुरु असून ४७ संस्था अवसायनात व ७० संस्थांची नोंदणी रद्द झाली आहे. अवसायानातील व नोंदणी रद्द झालेल्या ११७ संस्थांचे मुद्दल कर्ज ८३ कोटी ९ लाख माफ करण्यास मान्यता देण्यात आली.  त्याच प्रमाणे सध्याच्या कार्यरत १४४ संस्थांचे ५० टक्के मुद्दल कर्ज अशी ४९ कोटी ४५ लाख रुपये माफ करण्यास मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे एकूण १३२ कोटी ५४ लाख मुद्दल कर्ज माफ करण्यास मान्यता देण्यात आली.

## अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास महामंडळासाठी अभ्यासगट

अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास महामंडळासाठी अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजाच्या तरुणांना उद्योग आणि स्वयंरोजगारासाठी विविध योजना राबविण्यात येतील.

# शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी-वाणी, लोहार, नाथपंथीय समाजासाठी महामंडळे

राज्यातील विविध समाज घटकांसाठी वेगवेगळी महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. लाडशाखीय वाणी-वाणी समाजासाठी सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), लोहार समाजासाठी ब्रह्मलिन आचार्य दिव्यानंद पुरीजी महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), शिंपी समाजासाठी संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), गवळी समाजासाठी श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ त्याचप्रमाणे लोहार आणि नाथ पंथीय समाजासाठी महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपकंपन्यांसाठी पन्नास कोटी रुपयांचे भाग भांडवल देण्यात येईल.

## राज्यात आंतरराष्ट्रीय रोजगार व कौशल्य विकास कंपनी

जर्मनीतील बाडेन वुटेन बर्ग यांचे राज्याशी करण्यात आलेल्या सामंजस्य कराराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र स्टेट इंटरनॅशनल एम्प्लॉयमेंट ॲण्ड स्कील डव्हान्समेंट कंपनी स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. जर्मनीमध्ये निवड झालेल्या महाराष्ट्रातल्या उमेदवारांना व्हिसा व पासपोर्टबाबत मदत करणे, त्याचप्रमाणे इतर आवश्यक त्या उपाययोजना या कंपनीमार्फत करण्यात येतील. या कंपनीला तीन कोटी रुपये भागभांडवल उपलब्ध करून देण्यात येईल. सध्या या योजनेसाठी २७ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली असून १० हजार ५० उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाली आहे.

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा

आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठीचा हा अध्यादेश विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात मान्यतेसाठी सादर करण्यासाठी त्याचबरोबर या आयोगासाठी मंजूर असलेली अधिकारी, कर्मचारी यांची २७ पदे आयोगाच्या आस्थापनेवर हस्तांतरीत करण्यास देखील मान्यता देण्यात आली.

## प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व विकासासाठी नागनाथ आण्णा नायकवडी महामंडळ

सार्वजनिक प्रकल्पबाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व विकासासाठी नागनाथ आण्णा नायकवडी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व विकास महामंडळ स्थापन करण्यास मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. धरण, कालवे अशा सार्वजनिक प्रकल्पांसाठी शासनाकडून जमिन संपादित करण्यात येते. अशा प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडवण्यासाठी हे महामंडळ काम करेल.

## तुळजापूर, वणी-यवतमाळ येथे न्यायालय

तुळजापूर आणि वणी येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करून त्यासाठी पदे मंजूर करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सध्याच्या केळापूर सहदिवाणी न्यायलयातील ६८३ प्रकरणे वणीच्या नव्या दिवाणी न्यायालयात हस्तांतरीत होणार आहेत तर तुळजापूर येथे धाराशीव येथील जिल्हा व सत्र न्यायालयातून ८३१ प्रकरणे हस्तांतरीत होतील.

# पॅरालिम्पिकमध्ये भारताची चमकदार कामगिरी



**केंद्र** सरकारच्या खेलो इंडिया आणि टॉप्ससारख्या उपक्रमांच्या मदतीने, दिव्यांग खेळाडूंनी २८ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या पॅरिस २०२४ पॅरालिम्पिकमध्ये त्यांच्या अंगातील दिव्य शक्तीचे प्रदर्शन करत विक्रमी सात सुवर्ण पदकांसह २९ पदके जिंकून पॅरालिम्पिक इतिहासातील सर्वात्तम कामगिरी नोंदवली.

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारतीय खेळाडूंनी केवळ ४ विक्रमी ७ पदकेच जिंकली नाहीत तर अनेक विक्रमही रचले जे भारताच्या मजबूत क्रीडा परिसंस्थेला सिद्ध करतात. सरकारच्या खेलो इंडिया, टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम–टॉप्स आणि ३०० हून अधिक क्रोडा पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या त्याच बळकट परिसंस्थेमुळे भारताचा पॅरिस २०२४ पॅरालिंपिक प्रवास म्हणजे आत्तापर्यंतच्या सर्वात यशस्वी कामगिरीची गाथा आहे. खेळाडूंना सक्षम बनवण्यात, सर्व अडथळे आणि आव्हानांवर मात करून जागतिक मंचावर भारताचा झेंडा फडकवण्यात याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दिव्यांग खेळाडूंच्या लढाऊ भावनेचा आणि समर्पणाचाही हा पुरावा आहे. १९६८ मधील भारताच्या पॅरालिम्पिक पदार्पणाच्या नगण्य सुरुवातीपासून ते पॅरिसमधील शानदार कामगिरी आणि विक्रमी कामगिरीपर्यंत भारताने पॅरालिम्पिक खेळांमध्ये भारताचा दर्जा उंचावला आहे. नितीश कुमारने बॅडमिंटनमध्ये वर्चस्व गाजवत पुरुष एकेरी ५१.३ मध्ये सुवर्णपदक पटकावले. सुमित अंतिल आणि धरमबीर यांनी अनुक्रमे पुरुष भालाफेक ६४ आणि पुरुष क्लब थ्रो ४५१ मध्ये सुवर्णपदक जिंकले. तिरंदाजीमध्ये, हरविंदर सिंगने पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व्ह ओपनमध्ये सुवर्णपदक पटकावले. ■

## भारताची आजवरची कामगिरी

### लंडनमध्ये १ पदक

| वर्ष | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
|---|---|---|---|
| २०१२ | ० | १ | ० |

### रिओमध्ये ४ पदके

| वर्ष | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
|---|---|---|---|
| २०१६ | २ | १ | १ |

### टोकियोमध्ये १९ पदके

| वर्ष | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
|---|---|---|---|
| २०२० | ५ | ८ | ६ |

### पॅरिसमध्ये २९ पदके

| वर्ष | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
|---|---|---|---|
| २०२४ | ७ | ९ | १३ |

**पॅरालिम्पिक २०२४ हे विशेष आणि ऐतिहासिक ठरले आहे. आपल्या असामान्य पॅरा–अॲथलीट्सनी २९ पदके जिंकली आहेत, जी या स्पर्धामध्ये पदार्पण केल्यापासूनची भारताची सर्वोत्तम कामगिरी आहे; देशाला याचा सार्थ अभिमान आहे. ही उपलब्धी आपल्या खेळाडूंच्या अतूट समर्पण आणि अदम्य भावनेमुळे आहे. त्यांची कामगिरी अविस्मरणीय असून त्यांच्या कामगिरीने अनेक नवोदित खेळाडूंना प्रेरणा मिळाली आहे.**

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




**प्रति,**

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई–२०
दूरध्वनी : ०२२–२२०२२०५०, फॅक्स : ०२२–२२८५२३०५
ई मेल– bjpmaha.manogat@gmail.com